उत्तुंग तुझ्या भरारी पुढे
गगन हे ठेंगणे भासावे
तुझ्या विशाल पंखाखाली
अवघे विश्व वसावे...!

महिला दिनाच्या शुभेच्छा...!

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
रविवार, दि. ०८ मार्च २०२६

INTERNATIONAL WOMEN'S DAY

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १०२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

# सामान्यांना गॅसचटके; सिलिंडरच्या दरात वाढ

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या अमेरिका-इस्रायल व इराण यांच्यातील युद्धाचे चटके भारतातील सर्वसामान्य ग्राहकांना बसू लागले आहेत. घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची, तर व्यावसायिक सिलिंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने (आयओसी) घेतला. सिलिंडरचे दर शनिवारी तात्काळ लागू झाले असून वर्षभरातील ही दुसरी वाढ असल्याने विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. 'आयओसी'च्या संकेतस्थळानुसार, विनाअनुदानित एलपीजी सिलिंडर म्हणजे सामान्य कुटुंबे स्वयंपाकघरात वापरत असलेल्या सिलिंडरची किंमत दिल्लीत आता प्रति १४.२ किलोसाठी ९१३ रुपये, तर मुंबईत ९१२.५० रुपये असेल. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांनाही दरवाढीचा त्रास सहन



करावा लागणार आहे. त्यांना आता प्रति १४.२ किलो सिलिंडरसाठी ६१३ रुपये मोजावे लागणार आहेत. त्यानंतर त्यांना वर्षातून १२ रिफिलसाठी मिळणाऱ्या प्रति बाटली ३०० रुपये अनुदान द्यावे लागेल. जागतिक स्तरावर ऊर्जेच्या किमती वाढल्यामुळे ही वाढ आवश्यक असल्याचे उच्च सरकारी सूत्रांनी सांगितले. १४.२ किलोग्रॅम सिलिंडरचा जागतिक सरासरी दर १,०५० असून त्यापेक्षा भारतातील दर कमी आहे. प्रति कुटुंब दरवर्षी ४-५ सिलेंडरचा सरासरी वापर लक्षात घेता, ही वाढ चार जणांच्या कुटुंबासाठी दररोज ८० पैसे किंवा प्रति व्यक्ती फक्त २० पैसे इतकी आहे, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. दरम्यान, गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ झाली असली तरी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत अद्याप वाढ होणार नसल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांकडे पुरेशी क्षमता असल्याचे सांगण्यात आले. एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढल्यानंतर विरोधकांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. काँग्रेसने पंतप्रधानांना 'महागाईचे जनक' असे संबोधले. "पंतप्रधान नेहमीच सर्वसामान्यांवर महागाईचा आसूड चालवत असून त्यामुळे सामान्य कुटुंबाचा आर्थिक डोलारा कोसळत आहे," अशी टीका काँग्रेसने 'एक्स'वर केली. सिलिंडरची किंमत कमी करण्याची मागणी पंतप्रधान मोदी यांच्याकडे करावी की अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे करावी याबाबत संपूर्ण देश गोंधळलेला आहे, अशी टीका आम आदमी पक्षाने केली.






## थोडक्यात...

### एसटीच्या आठ हजार कोटीच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** ग्रामीण भागातील प्रवाशांच्या प्रवासाची गरज भागवणाऱ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) 77 वर्षपेक्षा जास्त काळ झाल्याने एसटीच्या ताफ्यातील बहुतांशी सर्व बस भंगारात काढण्याच्या मार्गावर आहेत. हजारो बस दर महिन्याला नादुरुस्त होत आहेत. एसटीचा पुर्नविकास करण्यासाठी 8 हजार 300 बस विकत घेण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यासाठी सरकारकडे 8 हजार कोटी रुपये अनुदान मागण्यात आले होते. यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने अडीच हजार कोटी रुपये देऊन एसटीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. एसटीच्या ताफ्यात सध्या 16 हजार 199 बस आहेत. त्यातील 14 हजार 956 बस डागडुजी करुन रस्त्यावर धावतात. अलीकडे अनेक नवीन बस दाखल झालेल्या आहेत. एसटीच्या ताफ्यातील अर्ध्या बस भंगारात काढून त्या जागी 8 हजार 300 बस नवीन घेण्याचा प्रस्ताव परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सरकारकडे पाठविला आहे.






# संपत बाबुराव उगले यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

## शिवसेना उपनेते विजय चौगुले यांची प्रमुख उपस्थिती!

**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील ज्येष्ठ नागरिक संपत बाबुराव उगले यांचा ७५ वा अभिष्टचिंतन सोहळा ऐरोली (नवी मुंबई) येथील गणेश कृपा वेलफेअर असोसिएशनच्या सभागृहात मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरा करण्यात आला. या सोहळ्यास शिवसेना उपनेते तथा विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत उगले यांचा सत्कार करून त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

संपत बाबुराव उगले यांनी आयुष्यभर कष्ट, प्रामाणिकपणा व सामाजिक जाणीव जपत कुटुंब व समाजासाठी योगदान दिले आहे. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सुपुत्रांनी हा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित केला. रमेश संपत उगले, महेंद्र संपत उगले आणि किशोर संपत उगले या तिन्ही मुलांनी आपल्या वडिलांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस आनंदात आणि संस्मरणीय पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला. नोकरीनिमित्त उगले कुटुंब मुंबईत वास्तव्यास असल्यामुळे हा सोहळा ऐरोली येथे आयोजित करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपत बाबुराव उगले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. शिवसेना उपनेते विजय चौगुले



यांनीही उगले कुटुंबीयांचे कौतुक करत कुटुंबातील ज्येष्ठांचा सन्मान करण्याची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी नगरसेवक शुभमभाई चौगुले व सौ. आरती शुभम चौगुले यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून उगले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शिवसेना कार्यकर्ते लक्ष्मण बेरे यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून कुटुंबीयांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश कृपा वेलफेअर असोसिएशनचे उपाध्यक्ष बापू देशमुख, दिलीप मुळीक, खजिनदार महेश सावंत, सचिव लक्ष्मण गंधाले तसेच विक्रांत कांबळे, दिनकर जाधव सर, रतन दरवे, संजय पवार, आनंदा गाढवे, निखिल देशमुख, अक्षय मराठे व राकेश थोरात यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय मित्रपरिवारातील अनिल जगताप, मारुती पारले तसेच चाळीतील सर्व सभासद व महिलांनी कार्यक्रमाच्या आयोजनात उत्स्फूर्त सहकार्य केले.

यावेळी पोपट कारभारी हाडवळे यांनीही संपत बाबुराव उगले यांना शुभेच्छा देत त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी गणेश कृपा वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष महेंद्र उगले यांनी उपस्थित सर्व मान्यवर, पाहुणे व सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत आनंददायी, आपुलकीच्या वातावरणात व उत्साहात पार पडला. उपस्थितांनी उगले कुटुंबियांसोबत हा आनंदाचा क्षण साजरा करत संपत बाबुराव उगले यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# आदर्श महिला विकास संस्थेच्या अध्यक्षपदी सौ. किशोरी जाधव व उपाध्यक्षपदी सौ. परीघा आरोटे!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षण व सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या आदर्श महिला विकास संस्थेच्या अध्यक्षपदी सौ. किशोरी राघु जाधव यांची तर उपाध्यक्षपदी अकोले तालुक्यातील सौ. परीघा विश्वासराव आरोटे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सौ. जाधव व सौ. आरोटे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे कार्य अधिक जोमाने पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच शिक्षण, सामाजिक प्रबोधन व विकासात्मक उपक्रम राबविण्यात ही संस्था नेहमीच अग्रेसर राहिली आहे. या निवडीबद्दल डॉ. विश्वासराव आरोटे (राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई) यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे




अभिनंदन करून त्यांच्या कार्याला खंबीर साथ देण्याचे आश्वासन दिले. "तुमच्या निवडीचा आम्हांस सार्थ अभिमान आहे," अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. दरम्यान, या निवडीबद्दल नूतन माध्यमिक विद्यालय पांजरे, जयभवानी माध्यमिक विद्यालय केळुंगण, मधुकर पिचड माध्यमिक विद्यालय पाडोशी, अकोले ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था, महिला ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था अकोले, चितळवेढे विविध कार्यकारी सेवा सोसायटी, मुक्ताई मजूर सहकारी संस्था अकोले, दै. समर्थ गांवकरी, ए.व्ही.पी. न्यूज व समर्थ गांवकरी न्यूज वृत्तवाहिनी, तसेच सोनेरी–छत्रपती पब्लिसिटी महाराष्ट्र राज्य आदी संस्थांच्या वतीनेही त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# पारनेरात ८ व ९ मार्च रोजी भव्य 'महाआरोग्ययज्ञ'

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर ग्रामीण रुग्णालय येथे ८ व ९ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्वात मोठ्या 'महाआरोग्ययज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसानिमित्त, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या संसदीय कारकिर्दीला ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या महाआरोग्य शिबिरात राज्यातील नामांकित रुग्णालयांतील एम.डी., एम.एस., डी.एन.बी. तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांची मोफत तपासणी, निदान व आवश्यक शस्त्रक्रिया करणार आहेत. हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी, अपेंडिक्स, हर्निया, मुळव्याध, भगंदर, गाठींची तपासणी, ईसीजी, नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया,



१२ वर्षांपर्यंतच्या हृदयरोगग्रस्त बालकांची मोफत शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा विकार, त्वचारोग, स्तन व गर्भाशय कर्करोग तपासणी, दंतरोग, आयुर्वेद-नॅचरोपॅथी उपचार तसेच पॅरालिसिस रुग्णांचे पुनर्वसन यांचा समावेश आहे. शिबिरातील सर्व तपासण्या व उपचार पूर्णपणे मोफत असतील. सहभागी रुग्णांसाठी भोजन व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. निदान झालेल्या रुग्णांवर पुढील सहा महिने सातत्याने उपचार व फॉलोअप करण्यात येणार असून त्याचा आढावा प्रतिष्ठानमार्फत घेतला जाईल. शिबिराचे उद्घाटन ८ मार्च रोजी सकाळी ९ वाजता माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी आमदार रोहित पवार, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार बजरंग सोनवणे, खासदार भास्कर भगरे, माजी आमदार प्राजक्त तनपुरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ल ना होशिंग विद्यालयासअ+ श्रेणी

**(समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने माध्यमिक शाळांचे मूल्यांकन करण्यात आले असून सदर मूल्यांकनामध्ये जामखेड येथील ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयस अ+ श्रेणी प्राप्त झालेली असून अ + श्रेणी मिळविणारे हे तालुक्यातील एकमेव विद्यालय ठरले आहे. शाळांची गुणवत्ता उंचावणे, संस्थात्मक सुधारणा करणे आणि पारदर्शकता आणणे या उद्देशाने राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत माध्यमिक शाळांच्या गुणवत्तेचे स्वमुल्यांकन आणि बाह्य मूल्यांकन करण्यासाठी शासनाने एक व्यापक मानकीकृत आराखडा तयार केलेला आहे. त्यानुसार शाळांचे मूल्यांकन करण्यात आले होते.

# बेकायदेशीर धर्मांतरविरोधी कायदा आणण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

राज्यात वाढत्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने "महाराष्ट्र फ्रीडम ऑफ रिलीजन (Prevention of Fraud & Coercion) Act" पारित करून लागू करावा, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशन (NSF) या सामाजिक संस्थेने केली होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नुकतीच कॅबिनेट बैठकीत हा कायदा आणण्याची तयारी केली आहे, राज्य सरकारच्या या भूमिकेचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत करण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा कायदा आणणयाचे सुतोवाच केल्याने त्यांचे आणि राज्य सरकारचे आभार माणण्यासाठी पुणे श्रमिक पत्रकार संघात पत्रकार परिषद आयोजित



करण्यात आली होती. यावेळो सीए सर्वेश मेहेंदळे, संचालक प्रीतम थोरवे, पुष्कर सप्रे उपस्थित होते

नागरिक सोशल फाऊंडेशनने मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले होते की, महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भाग विशेषतः धुळे, नंदुरबार, पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे धर्मांतराच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अशा प्रकारचे अवैध धर्मांतर हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे असून सामाजिक सौहार्दालाही गंभीर धोका निर्माण करणारे आहे.

संस्थेने स्पष्ट केले आहे की धर्मांतर हे केवळ व्यक्तीच्या श्रद्धा, स्वेच्छा आणि जाणिवेवर आधारित असावे; दबाव, फसवणूक, आर्थिक लाभ किंवा इतर प्रलोभनाद्वारे केलेले धर्मांतर अवैध ठरले पाहिजे. अशा कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा आदर राखत सर्व समुदायांचे संरक्षण, धार्मिक समरसता आणि सामाजिक शांतता दृढ होऊ शकते. तसेच परकीय निधी किंवा अनधिकृत धार्मिक बांधकामांचा गैरवापर थांबवता येईल, आणि दोषी संस्था किंवा व्यक्तींवर कठोर कारवाई करता येईल. नागरिक सोशल फाउंडेशनने सार्वजनिक जनजागृती, सामाजिक संशोधन, कायदेविषयक अभ्यास, तसेच कायदा अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारे डेटा, दस्तऐवज आणि समुदाय संवादाच्या प्रक्रियेत राज्य सरकारला सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

बेकायदेशीर धर्मांतर हा मुद्दा प्रसार माध्यमांनी व्यवस्थित हाताळल्याने हा कायदा होण्याच्या दृष्टीने पाऊल पडले आहे यामुळे नागरिक सोशल फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व पत्रकार, वृत्तपत्रे आणि वृत्त वाहिन्यांचे आभार मानले.

# मिस अँड मिसेस महाराष्ट्र २०२६ स्पर्धेच्या ऑडिशन्सची घोषणा




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्मृती एंटरप्राईझेसच्या वतीने 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र 2026' या भव्य राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील महिलांना आपली प्रतिभा, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व प्रभावीपणे सादर करण्याची संधी मिळणार आहे.

या पत्रकार परिषदेला स्मृती एंटरप्राईझेसच्या संचालिका स्मृती बोनगे, संचालक आधार शिंदे तसेच इवेंट पार्टनर सारिका तुळवे पाटील,अनिल व्यवहारे,ईशा यादव उपस्थित होते. स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी सदाशिव पेठ येथील सॅफ्रॉन बॅन्क्वेट्स येथे होणार असून यावेळी सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या स्पर्धेत 18 ते 55 वयोगटातील महिलांना सहभागी होता येणार असून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. सहभागी महिलांसाठी विविध मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या स्पर्धेत विवाहित आणि अविवाहित महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले असून अंतिम फेरीत विजेत्यांना एकूण 12 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे तसेच मनोरंजन, फॅशन आणि मॉडेलिंग क्षेत्रात पुढे जाण्याच्या विविध संधी मिळणार आहेत. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये ऑडिशन्स आयोजित करण्यात येणार असून त्यातून निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये ग्रँड फिनाले पार पडणार आहे.

फिनाले मध्ये ज्या स्पर्धकांची निवड होईल अशा 40 स्पर्धकांना स्मृती एंटरप्राईझेस आणि पेंटेन स्टुडियोज प्रस्तुत 'जयोस्तुते' या म्यूजिक अल्बम मधे काम करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी +91 91676 73663, +91 91522 23663, +91 90961 50750 या क्रमांकांवर संपर्क साधून नोंदणी करावी किंवा www.thejewelonepageant.comया संकेतस्थळावर नावनोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# २३ लाखांचा सुवर्ण-हिरे जडीत हार अर्पण!

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

श्री साईबाबांवर देश-विदेशातील लाखो भाविकांची अढळ श्रद्धा असून भाविक विविध प्रकारे श्रींच्या चरणी दान अर्पण करत असतात. त्याच भावनेतून तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथील साईभक्त श्री. के. एस. एस. भगवान यांनी साईबाबांच्या चरणी १९३.७०० ग्रॅम वजनाचा आकर्षक नक्षीकाम असलेला सुवर्ण-हिरे जडीत हार अर्पण केला. या हाराची किंमत सुमारे २३ लाख ५९ हजार ६५३ रुपये आहे. यावेळी जिल्हा व प्रधान न्यायाधीश तसेच श्री साईबाबा संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष शिवाजीराव कचरे यांच्या हस्ते दानशूर साईभक्तांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांवरील स्क्रिन टाईम कमी करावा : डॉ. तृप्ती पंडीत

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

- अगस्ति महाविद्यालयात ऑनलाईन व्याख्यानमाला

आजच्या विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांवरील स्क्रिन टाईम कमी करून वाया जाणारा वेळ अभ्यासासाठी वापरावा आणि त्याचे दुष्परिणाम टाळावेत असे प्रतिपादन बालरोग तज्ज्ञ डॉ. तृप्ती पंडित यांनी केले. अकोले येथील अगस्ति, कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयात ग्लोबल नगरी फाऊंडेशन या ऑनलाईन व्याख्यानमालेत ,'सोसिअल मेडिया डुज अॅण्ड डोण्ट'या विषयावर बोलत होत्या . त्या पुढे म्हणाल्या की, समाज माध्यमावर किती वेळ जातो याचा विचार आजची तरुण पिढी करत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता कमी होत असून कार्यक्षमतेवर



विपरीत परिणाम होत आहेत. आरोग्यविषयक अनेक धोके निर्माण होत आहेत. स्क्रिन टाईम कमी करण्यासाठी विविध प्रकारचे छंद जोपासणे गरजेचे आहे.नियमितपणे व्यायाम करणे, पुस्तके वाचणे यासारख्या सवयी लावल्यास निरोगी आयुष्य आणि प्रसन्नता प्राप्त होते. समाज माध्यमांचा वापर स्वतःच्या कौशल्य निर्मिती साठी केला पाहिजे . शिवाय आपल्याला नोकरी मिळविण्यासाठी आणि देश विदेशात संबंध प्रस्थापित करण्यासाठी, स्वतःच्या विकासासाठी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कोमल राठी यांनी केले तर आभार प्रा.डॉ. महेजेबीन सय्यद यांनी मानले.

# जागतिक महिला दिनानिमित्त शिक्षिकांचा गुणगौरव

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ संचलित पुष्पावती विद्यालय डिंगोरे येथे जागतिक महिला दिनानिमित्त विद्यालयातील महिला शिक्षिकां चा गुणगौरव समारंभ उत्साहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश कोंढार यांनी केले.यावेळी त्यांनी जागतिक महिला दिन का ? साजरा केला जातो याबाबत माहिती देत भारतातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांची उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर मांडली. या कार्यक्रमात विद्यालयातील विद्यार्थिनी समृद्धी मंडलिक, श्रावणी बनकर,शरयू कोरडे, आराध्या सोनवणे,स्वरा नलावडे,जोया पठाण,अनुष्का शेरकर,सृष्टी अहिनवे,श्रुती कवडे,स्वरा उकिरडे व ईश्वरी फोपसे यांनी महिला दिनाविषयी माहिती सांगितली.



विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांच्या हस्ते विद्यालयातील सर्व महिला शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मुख्य वक्त्या म्हणून शिक्षिका अनुराधा नरवडे यांनी महिला दिनाचे औचित्य व महत्त्व विशद केले. त्या म्हणाल्या की,दरवर्षी ८ मार्च रोजी जगभर आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जातो.

महिलांच्या सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्या हक्कांविषयी जागृती करण्याचा या दिवसा मागील मुख्य उद्देश आहे.

# स्त्रियांना मिळणारा सन्मान मिळविण्यासाठी मुलींनी निर्भय बनलेच पाहिजे

## रविंद्र भोर : शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये निर्भय कन्या अभियानात व्याख्यान

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आपणास जीवनामध्ये योग्य ते मार्गदर्शन करते,तसेच जीवनात यश मिळवण्यासाठी आपण त्यांचे गुण अंगीकारावे,शिवकालीन युगामध्ये स्त्रियांना जो सन्मान मिळत होता तो सन्मान आज कालच्या परिस्थितीतही मिळवून देणे ही आपली सर्वांची जबाब- दारी आहे त्याचबरोबर प्रत्येक मुलीने निर्भय बनले पाहिजे असे आवाहन करिअर मार्गदर्शक, चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे बँड अँबीसिडर आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष,तथा जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी केले. डुंबरवाडी ताः-जुन्नर येथील गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ








इंजिनियरिंगच्या विद्यार्थिनींना निर्भय कन्या अभियाना अंतर्गत व्याख्यान आयोजित केले होते यावेळी ते बोलत होते प्राचार्य डॉ.गोविंद खरात,तायकोंदो राष्ट्रीय रेफरी किरण जयकर,स्पोर्ट टीचर आरती बनसोडे,विभागप्रमुख, प्रा.निता बाणखेले,विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.मोनिका रोकडे,विभागप्रमुख प्रा.पूजा घोलप,प्रा.पूजा निघोजकार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सदर अभियान राबविताना छत्रपती शिवाजी महाराजांनी महिला सबलीकरण महिलांचा व्यक्तिमत्व विकास, सियांची प्रेरणास्थाने,स्त्रीयांचे स्वास्थ्य,महिला उद्यमशीलता, स्त्री-पुरुष समानता,समान संधी,लिंगभाव जागृतीसहसंवाद सहवेदना,विवाहपूर्व समुपदेशन, महिलांचा सामाजिक,कौटुंबिक सुसंवाद,विद्यार्थिनी-पालक शिक्षक परस्पर सहसंवाद, परिस्थितीजन्य निर्णयक्षमता तसेच स्त्री हक्क व अधिकार विषयक नियम संहिता कायदे.

व स्त्रियांचे घटना व संवैधानिक अधिकार स्त्रीयांविरुद्ध अयोग्य वर्तन,अन्याय,प्रकारची हिंसा, मानसिक,शारीरिक,सामाजिक इत्यादी स्वरूपाचा आघात, अनुचित शेरेबाजी,अनुचित मागणी,अनुचित विनंती,तसेच इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक,अशाब्दिक स्वरुपाची अस्वागतार्ह अथवा अस्विकारार्ह वागणूक तसेच स्त्रीयांच्या आत्म सन्मानाला बाधा पोचेल अशा कोणत्याही स्वरूपाच्या वर्तना पासून,अनुभवापासू व यांचा प्रतिकार व प्रतिबंध इत्यादी बिंदूंवर आधारित विषयाच्या स्वरूपानुसार मार्गदर्शन केले.या माध्यमातून विद्यार्थिनींना बौद्धिक,शारीरिक, मानसिक, भावनिक इत्यादी स्तरावर तरुण मुली व महिला सक्षम,निर्भय बनविण्याच्या दृष्टीने हे रविंद्र भोर सरांचे व्याख्यान मोलाचे ठरेल अशी प्रतिक्रिया प्राचार्य डॉ. गोविंद खरात यांनी दिली.

# विज्ञान सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर ता:-जुन्नर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णा साहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे डीबीटी स्टार कॉलेज योजने अंतर्गत रसायनशास्त्र विभागामार्फत विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान सप्ताह निमित्ताने विविध उपक्रम घेण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट यांनी दिली. विज्ञान सप्ताहाच्या पहिल्या दिवशी सोमवार दिनांक २३ फेब्रु रोजी रसायनशास्त्र विभागामध्ये सदर सप्ताहाचा उद्घाटन समारंभ पार पडला.कार्यक्रमा च्या उद्घाटन समारंभ प्रसंगी बाळासाहेब जाधवमहाविद्यालय आळे येथील ज्येष्ठ प्राध्यापक, नामवंत लेखक डॉ.जयसिंग गाडेकर हे प्रमुख



व्याख्याते उपस्थित होते. डॉ.गाडेकर सर यांनी "दैनंदिन जीवन, रसायन शास्त्र आणि नोकरीच्या संधी" या विषयावर सखोल माहिती दिली.यावेळी त्यांनी विज्ञाना तील भारतीय शास्त्रज्ञांचे विज्ञानातील मोलाचे योगदान व संशोधन तसेच रसायनशास्त्र व संलग्रित क्षेत्रा तील असणाऱ्या नोकरीच्या संधी या संदर्भात देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,सर्व विभाग प्रमुख,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होता.सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी पासून महाविद्यालयात सुरू झालेल्या विज्ञान सप्ताहामध्ये शास्त्र शाखेतील विविध विभागांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती डीबीटी स्टार कॉलेज योजना समन्वयक प्रा.रोहिदास मेमाणे यांनी दिली. आभार प्रदर्शन महाविद्यालया तील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. एकनाथ कबाडी यांनी केले. विज्ञान सप्ताहानिमित्त रसायनशास्त्र विभागामध्ये रांगोळी स्पर्धा,शास्त्रीय चित्रकला,निबंध लेखन, प्रश्नमंजुषा,शास्त्रीय प्रतिकृती तयार करणे व सादरीकरण स्पर्धा,शास्त्रीय उपकरणे (युव्हीडीआर एस,एफटीआय आर,अणु शोषण स्पेक्ट्रोस्कोपी, एचपीएल सी,गॅस क्रोमॅटोग्राफी) प्रात्यक्षिक सखोल माहिती, अनुक्रमे प्रा.रत्नमाला मोरे,प्रा. सुवर्णा डुंबरे,प्रा.एस.एस कुलकर्णी,प्रा.रोहिदास मेमाणे, डॉ.धनंजय गडगे व प्रा.स्वप्नाली दांगट यांनी विद्यार्थ्यांना सांगितली शास्त्रीय उपकरणे हाताळणी व प्रात्यक्षिक माहिती डॉ. योगेश्वर काळदंते यांनी दिले. सदर विविध स्पर्धा व उपक्रमां मध्ये शास्त्र शाखेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. उपरोक्त कार्यक्रमांच्या आयोजनासाठी रसायनशास्त्र विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले शनिवार दिनांक २८ फेब्रु रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने रसायनशास्त्र विभागामार्फत कात्रज दूध शीतकरण केंद्र ओतूर येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. सदर शैक्षणिक सहलीमध्ये विज्ञान शाखेतील ५१ विद्यार्थी व रसायनशास्त्र विभागातील ०६ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या सहली दरम्यान विद्यार्थ्यांना दूध संकलन व त्यावर केल्या जाणाऱ्या प्राथमिक प्रक्रिया यांबद्दल सखोल माहिती दूध शीतकरण केंद्रातील प्रभारी अधिकारी व त्यांचे इतर् सहकारी यांनी दिली.विज्ञान सप्ताहाचा समारोप आरती इंडस्ट्रीज लिमिटेड नवी मुंबई, महाराष्ट्र येथील सीनियर मॅनेजर डॉ. संदीप गडगे यांच्या व्याख्यानाने करण्यात आली. या व्याख्याना दरम्यान डॉ. संदीप गडगे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात रसायनशास्त्र विषयात असलेल्या विविध नोकरी विषयक संधी याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. उपरोक्त नमूद विविध कार्यक्रम उत्तम व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी रसायनशास्त्र विभागातील डॉ.एकनाथ कबाडी,डॉ. योगेश्वर काळदंते, डॉ.धनंजय गडगे,प्रा.सुवर्णा डुंबरे,प्रा.रोहिदास मेमाणे,प्रा. रत्नमाला मोरे, प्रा.स्वप्नाली दांगट,प्रा.श्वेताली कुलकर्णी आणि विभागातील शिक्षकेतर कर्मचारी निखिल काकडे, किरण ढोमसे,श्रीमती. तरन्नुम शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांचे बहुमूल्य मार्गदर्शन मिळाले.

## काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शर्मिला गोसावी यांची निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संत कान्होपात्रा महिला साहित्य संमेलनाच्या संमेलनामध्ये होणाऱ्या निमंत्रिताच्या काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री शर्मिला गोसावी यांची निवड करण्यात आली अशी माहिती संयोजन समितीच्या अध्यक्षा जयश्री मेटे व निमंत्रण समितीच्या अध्यक्षा स्वाती पाटील यांनी दिली.

सीएसआरडी मधील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले साहित्य नगरीतील मुक्ताबाई सभागृहात संत सोयराबाई कवी मंचावर मंगळवार दि. १० मार्च रोजी दुपारी १.३० वाजता होणाऱ्या निमंत्रित कवयित्रींच्या काव्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या राज्य कार्यकारणी सदस्य शर्मिला गोसावी यांची निवड झाली असून त्यांना यापूर्वी नऊ काव्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून



सन्मान मिळालेला आहे. वॉरियर्स फाउंडेशनच्या अध्यक्षा असलेल्या शर्मिला गोसावी यांचे बांगड्यांची खैरात, मनमित काव्यसंग्रह प्रकाशित असून सात विविध प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे त्यांनी संपादन केले आहे. त्यांनी संपादित केलेल्या "वन्स मोअर मराठी कविता" या संग्रहाचा शासनाच्या ग्रंथ खरेदीत समावेश झाला होता. शर्मिला गोसावी यांचे अहिल्यानगर, पुणे आकाशवाणीवर अनेक वेळा काव्य वाचन झालेले असून विविध कार्यक्रमाचे सूत्रसंचालक म्हणून त्या गेल्या तीस वर्षापासून कार्यरत आहेत. शब्दगंध प्रकाशनच्या त्या संचालिका असून आत्तापर्यंत ग्रामीण भागातील नवोदिताची ३५० पुस्तके त्यांनी प्रकाशित केलेली आहेत.यावेळी कवयित्री श्रीमती नजमा शेख प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून २० निमंत्रित कवयित्री या काव्य संमेलनात सहभागी होणार आहेत. शर्मिला गोसावी यांचे हेमलता पाटील, भारती गवळी,रूपाली सोनवणे, दिपाली तवले, पायल बडबडे,रूपाली गायकवाड, अश्विनी झगडे, वर्षा थोरात व शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या राज्य कार्यकारणी सदस्य स्वाती ठुबे, जयश्री झरेकर यांनी अभिनंदन केले आहे.

## उद्योजकाचे यशस्विनी प्रदर्शन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ संचलित महिला मंडळाच्या वतीने महिला दिनानिमित्त महिला उद्योजकता वाढविण्यासाठी व महिला सक्षमीकरणासाठी काल दि ७ मार्च दिल्लीगेट पटांगण अहिल्यानगर येथे यशस्विनी २०२६ प्रदर्शन आयोजित केले असून त्यात शहरासह जिल्ह्यातील ४५ महिलांचे स्टोल आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन सकाळी १० वा महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते होणार असून यावेळी अध्यक्षस्थानी आमदार संग्रामभैय्या जगताप असणार असून प्रमुख उपस्थिती पाहुणे म्हणून उपमहौपर धनंजय जाधव ,धनश्रीताई विखे पा.अध्यक्ष,रणरागिणी महिला मंडळ, महावीर ग्रुपचे संचालक राजुशेठ भंडारी,मनपा स्थायी समितीचे सदस्य सुरेश बनसोडे उपस्थित राहणार आहेत.

## पर्यावरण पूरक रंगपंचमी साजरी करण्यासाठी मार्गदर्शन

■ नैसर्गिक घटकां चा वापर करून तयार केले रंग

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

भारतीय संस्कृतीमध्ये सणांना अनन्य साधारण असे महत्त्व आहे.त्यामध्ये येणारा होळी हा सण भारतीयांसाठी आनंद घेऊन येणारा असून तो वसंत ऋतुच्या आगमनाचा व स्वागताचा असतो. होळीनंतर रंगपंचमी साजरी केली जाते. रंगपंचमी साजरी करताना एकमेकांना रंग लावण्यासाठी सर्वजण बाजारातील रासायनिक रंगांचा वापर करतात. याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतो. त्याचे शरीरावर होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावेत यासाठी ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये इको फ्रेंडली रंगपंचमी साजरी करण्यासाठी नैसर्गिक



रंग कसे तयार करावेत याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आलेअशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. विद्यार्थ्यांना रंगपंचमी साजरी करत असताना बाजारातील रासायनिक रंगांच्या वापरामुळे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम व पर्यावरणातील घटकांचा वापर करून तयार केलेल्या रंगामुळे होणारे फायदे याबाबत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय हरित सेनेचे संतोष कांबळे यांनी मार्गदर्शन केले.बाजारातील काळा,निळा,हिरवा,लाल,चांदी सारखा निळा या रंगांचा वापर केला जातो.या रंगांमध्ये ऑक्साईड,कॉपर सल्फेट , मर्क्युरीक सल्फाईट,पर्शियन नीळ,ॲल्युमिनियम ब्रोमाईड यारखी रासायनिक घटक असतात.यामुळे डोळे लाल होणे,त्वचेला खाज येणे,अंगावर पुरळ येणे,त्वचेची आग होणे , मूळ संस्थेचे कार्य बंद पडणे, कर्करोग,तात्पुरता किंवा कायम स्वरूपाचा आंधळेपणा येणे यासारखे घातक परिणाम मानवी शरीरावर होतात. निसर्गातील घटकांचा म्हणजे झाडांची पाने,फुले,बीट,घरगुती हळद,पालक ,गुलाब,जास्वंद, गुलमोहराची पाने,पळसाचे फूल यांपासून विविध रंग तयार करता येतात.हे रंग तयार करण्यास खर्च येत नाही.पाणी कमी वापरावे लागते परिणामी पाण्याची बचत होते.कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. मानवी शरीरावर दुष्परिणाम होत नाही.यावेळी सर्व विद्यार्थ्यां नी रंगपंचमी इको फ्रेंडली साजरी करण्याची शपथ घेतली.

याप्रसंगी ग्राम विकास मंडळ ओतूरचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,सचिव प्रदीप गाढवे,पंकज घोलप, नितीन तांबे,राजश्री भालेकर, संजय हिरे,अजित डांगे, संतोष कांबळे,लक्ष्मण दुडे विद्यालया तील सर्व शिक्षक उपस्थित होते.

# कोतुळ येथे शिवजयंती महोत्सव उत्साहात

*शिवज्योत, भव्य मिरवणूक व व्याख्यानाने वातावरण शिवमय!*

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**

शिवजयंती उत्सव समिती कोतुळ २०२६ महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा करण्यात आला. स्वराज्याची आदर्श प्रशासन व्यवस्था, शौर्य, लोककल्याणकारी शासन आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा देणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. महोत्सवाची सुरुवात गुरुवारी (दि. ५ मार्च २०२६) रात्री ९.३० वाजता शिवज्योत आणण्यासाठी कोतुळ येथून शिवनेरी किल्ल्याकडे प्रस्थान करून झाली. त्यानंतर शुक्रवारी (दि. ६ मार्च २०२६) सकाळी ८.३० वाजता शिवज्योतीचे कोतुळ येथे



आगमन झाले व तिचे उत्साहात स्वागत करण्यात आले. सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा महाभिषेक करण्यात आला.

सायंकाळी ४ वाजता भव्य सजवलेल्या रथातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत कोतुळेश्वर विद्यालय कोतुळ येथील मुलींनी टिपऱ्या पथक सादर करून उपस्थितांची मने जिंकली, तर सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय कोतुळ येथील मुलींनी लेझीम पथकाच्या खेळातून संपूर्ण गाव दुमदुमून टाकले. संपूर्ण कोतुळ गावातून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सायंकाळी ५ वाजता जागर भवानी मातेचा कार्यक्रम शाहीर कैलास अटक यांनी सादर केला. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता शिवव्याख्याता सौ. गीतांजलीताई झेंडे यांचे जाहीर व्याख्यान झाले. या व्याख्यानाचा लाभ कोतुळ व परिसरातील मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी रात्री ९.३० वाजता उपस्थितांना शिवप्रसादाचे वाटप करण्यात आले. संपूर्ण दिवस चाललेल्या या शिवजयंती महोत्सवामुळे कोतुळ गावात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.




## Ai+ स्मार्टफोनचा Pulse 2 लॉन्च

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

Ai+ Smartphone ने भारतात आपला नवीन Pulse 2 स्मार्टफोन सादर केला आहे. 50MP AI कॅमेरा, 6000mAh बॅटरी आणि 120Hz डिस्प्ले यांसारख्या वैशिष्ट्यांसह हा स्मार्टफोन किफायतशीर दरात उपलब्ध करण्यात आला आहे. या फोनची विक्री ११ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यापासून Flipkart वर सुरू होणार आहे. Pulse 2 दोन व्हेरिएंटमध्ये उपलब्ध असेल – 4GB RAM + 64GB स्टोरेज आणि 6GB RAM + 128GB स्टोरेज. विशेष लॉन्च ऑफर अंतर्गत 4GB + 64GB व्हेरिएंटची किंमत ₹5,999 ठेवण्यात आली असून ही ऑफर पहिल्या २४ तासांसाठी असेल.

## नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना होणार फायदा

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

राज्यातील महायुती सरकारने शुक्रवारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतचे कर्जमाफी देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

नगर जिल्ह्यातील नियमित कर्ज भरणाऱ्या जिल्हा बँकेच्या १ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या अनुदानाचा लाभ होणार आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ होणार आहे. यासाठी बँकांना पुन्हा कर्जाच्या रक्कमेची विगतवारी करून आकडेवारी घ्यावी लागणार आहे.गेल्या काही महिन्यांपासून महायुती सरकारच्या कर्जमाफीवर काम सुरू होते. नगर जिल्ह्यात शेतीला अर्थ पुरवठा करणारी सर्वात मोठी आर्थिक संस्था म्हणून



ओळख असणाऱ्या जिल्हा बँकेने या पूर्वीच राज्य सरकारच्यावतीने तयार करण्यात आलेल्या पोर्टलवर कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांच्या थकीत कर्जाची आकडे आणि त्यांची संख्या याबाबतची माहिती ऑनलाईन सादर केलेली आहे.

नगर जिल्ह्यात जवळपास २ लाख ७५ हजार शेतकऱ्यांचे शेती कर्ज थकीत असल्याचे जिल्हा बँकच्यावतीने शासनाला कळवण्यात आले होते.

राज्य सरकारच्या वतीने कर्जमाफीच्या घोषणेसह यात पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यानुसार नगर जिल्ह्यात जिल्हा बँकलह राष्ट्रीयकृत बँकांना पिक कर्जासह ३० सप्टेंबरपर्यंत दोन लाखापर्यंत थकीत कर्ज आणि शेतकऱ्यांची आकडेवारी ही घ्यावी लागणार आहे. अथवा घेतलेल्या आकडेवारीत पुन्हा फोड करून त्यात पिक कर्ज आणि दोन लाखांपर्यंतचे कर्जदार यांची माहिती घ्यावी लागणार आहे.

## अहिल्यानगर मनपा वॉर्ड १६च्या नगरसेविका वर्षा काकडे यांचा गौरव



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर महानगरपालिका वॉर्ड क्रमांक १६ मधून नगरसेवकपदी निवडून आलेल्या वर्षा सुजित काकडे यांचा सत्कार करण्यात आला.त्यांच्या तर्फे त्यांचे सासरे उद्योजक बाबुराव काकडे यांनी हा सत्कार स्वीकारला. वर्षा काकडे यांच्या विजयानंतर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल विविध मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. या प्रसंगी एन.आर. कन्स्ट्रक्शनचे संचालक तसेच माजी उपमहापौर हाजी नजीर यांच्या हस्ते वर्षा सुजित काकडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात दरबार कन्स्ट्रक्शनचे हाजी वाजीद जहागिरदार हेही उपस्थित होते.

उपस्थितांनी वर्षा काकडे यांना शुभेच्छा देत आगामी काळात वॉर्डाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना हाजी नजीर म्हणाले की वर्षा काकडे यांनी नागरिकांचा विश्वास संपादन करत ही निवडणूक जिंकली असून त्या निश्चितच जनतेच्या अपेक्षा पूर्ण करतील. वॉर्डातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते व इतर विकासकामांसाठी त्या प्राधान्याने काम करतील, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## सांस्कृतिक व क्रिडा स्पर्धेत अ.ए.सो.चे अध्यापक विद्यालयाचे सुयश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (संगमनेर) वतीने जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयासाठी (डी.एल.एड.) जिल्हांतर्गत क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ पाउलबुद्धे कॉलेज येथे संपन्न झाला. या कार्याक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर साहेब होते, तर प्रमुख अतिथी म्हणून सेवा संस्थेचे देशमुख सर व डाएट चे जेष्ठ अधिव्याख्याता श्री. लक्ष्मण सुपे साहेब, तसेच अधिव्याख्याता श्री. मुकुंद दहिफळे साहेब, सांख्यिकी सहाय्यक श्री. नितीन टिळेकर सर आदि उपस्थित होते.

अध्यापक विद्यालयातील या स्पर्धांसाठी क्रिडा अध्यापक श्री.



उपासणी एम.एस., सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीम. बालटे ए.एम. यांनी कामकाज पाहिले. अ.ए. सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया व सर्व मान्यवर पदाधिका-यांचे या कामासाठी मार्गदर्शन मिळाले. यापुढेही आपली प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. राजेश बनकर साहेब म्हणाले की, कला व क्रिडा या दोन्ही बाजू माणसाला नव चैतन्य देत असतात. भावी शिक्षक हा शरीराने व मनाने सक्षम असला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या अंगी एखादी तरी कला जोपासली पाहिजे. या कार्यक्रमाचे आभार श्री. अन्नदाते सर यांनी केले. तर कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठी श्री. सचिन शिंदे सर अ.ए.सो. चे श्री. मंगेश उपासनी सर व यशवंतराव गाड़े अध्यापक विद्यालयाचे श्री. साठे सर व सर्व प्राचार्य यांनी यांनी कामकाज पाहिले. याप्रसंगी आपल्या शुभेच्छा संदेशात श्री. सुपे साहेब ज्येष्ठ अधिव्यख्यता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे यांनी सर्व छात्राध्यापकानी अनेक क्षेत्रात प्रगति करावी व आपल्या व्यक्तिमात्वात भर टाकावी असे सूचित केले, याप्रसंगी जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व अध्यापकचार्य उपस्थित होते.

यावेळी आपल्या उत्कृष्ट क्रीडा नियोजन व स्पर्धा नियोजनासाठी मार्गदर्शक म्हणून कामकाज पाहिलेले प्राचार्य व अध्यापक यांचा सन्मान प्राचार्य डॉ. राजेश बनकर साहेब यांनी केला. अहमदनगर जिल्हांतर्गत अध्यापक विद्यालय क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये अ.ए. सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांनी घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये सांघिक व सांस्कृतिक प्रकारात विविध बक्षीसे पटकावली. सर्व जिल्हयातील अध्यापक विद्यालयांमध्ये अ.ए. सोसायटी अध्यापक विद्यालयाने पुढील स्पर्धामध्ये चकमदार कामगिरी केली. अध्यापक प्रथम क्रमांक, समूहगीत उत्तेजनार्थ तसेच थ्रो विद्यालयाच्या शै. साहित्य स्पर्धा प्रथम क्रमांक, पोस्टर स्पर्धा स्पर्धा- द्वितीय क्रमांक, रांगोळी स्पर्धा उत्तेजनार्थ, निबंध स्पर्धा बॉल मूले - तृतीय क्रमांक मिळवला. यासाठी प्रेरणा अ.ए. सोसायटीच्या सन्मा. प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया मॅडम यांनी प्रेरणा दिली. व शाला समिती चेअरमन श्री. प्रकाशजी गांधी साहेब, संस्था विश्वस्त व शाला समिती सदस्य ॲड. श्री. गौरवजी मिरीकर सर व संस्था सल्लागार मंडळ सदस्य व शाला समिती सदस्य श्री. भूषण भंडारी सर या सर्वांनी मुलांचे मनापासून अभिनंदन केले. प्राचार्य श्री. संदीप उबाळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. तर क्रिडा अध्यापक श्री. मंगेश उपासनी सर आणि सर्व अध्यापक यांनी मुलांचा सराव करुन घेतला. तसेच या स्पर्धासाठी अध्यापक विद्यालयातील श्री. काटे एस.एम., श्री. म्हस्के पी.के., श्रीमती. परदेशी एस.एस., श्रीमती. कुंभार एस.बी. श्रीमती. झांबरे एस.एस., श्रीमती. साळवे ए.व्ही., यांचे सहकार्य लाभले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर साहेब व तसेच श्री. सुपे साहेब ज्येष्ठ अधिव्यख्यता व स्पर्धा व्यवस्थापक श्री. मुकुंद दहिफळे साहेब यांनी तसेच स्पर्धा नियोजक व देखरेख साठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे सांखिकी विभाग प्रमुख श्री. नितिन टिळेकर साहेब यांनी श्री. उपासनी सर यांचे कौतुक केले.

# मिरजगावचे सुपुत्र रोहन लगस यांची 'पीएसआय' पदी निवड



## कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर गाठले यशाचे शिखर !

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील सुपुत्र रोहन रावसाहेब लगस यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर निवड झाली आहे. त्यांने अथक परिश्रम, संघर्ष, जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत उत्तुंग असे यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घालत मिरजगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याच्या या यशामुळे मिरजगाव गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. रोहन लगस याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मिरजगाव येथे झाले. तर पुणे येथे नामांकित महाविद्यालयात बीएसस्सी ॲग्री पदवीचे शिक्षण पूर्ण करून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमाला सुरुवात केली. कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करत आपल्या कुटुंबासह गावाचेही नाव उज्वल केले आहे. रोहनने अत्यंत प्रतिकुल आणि खडतर परिस्थितीवर मात करत पितृछत्र हरपले असताना देखील हा यशाचा पल्ला गाठला आहे. अत्यंत कमी वयात ग्रामीण भागातून स्पर्धा परीक्षेत यश मिळवून त्यांनी अनेक तरुणांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. चि.रोहन लगस हा मिरजगाव येथील उद्योजक कै.रावसाहेब लगस व श्रीमती. पुष्पा रावसाहेब लगस यांचा चिरंजीव आहे. या यशामध्ये त्याची आई तसेच चुलते भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त सुभेदार मेजर बाळासाहेब लगस, मेजर दत्तात्रय लगस, आणि बहिण सीआयडी इन्स्पेक्टर पुजा लगस यांची त्यांना मोलाची साथ मिळाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावातील नागरिक, मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत असून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत..



ठाणे : दिवा पश्चिम येथे नगरसेविका स्नेहा अमर पाटील यांच्या निधीतून लोकमागणी लक्षात घेऊन तसेच शिवसेना विभागप्रमुख भालचंद्र भगत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बालदा नगर येथील आचला अपार्टमेंट परिसरातील गटर कामाचा शुभारंभ करण्यात आला. प्रसंगी शिवसेना नगरसेवक व शहरप्रमुख शैलेश मनोहर पाटील, युवासेना दिवा शहर अध्यक्ष अमर ब्रम्हा पाटील, विभागप्रमुख भालचंद्र भगत तसेच उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख, शिवसेना पदाधिकारी, दिवा ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### कर्जत व जामखेड तालुक्यातील चार धार्मिक स्थळांना 'ब'वर्गाचा दर्जा

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील चार धार्मिक स्थळांना 'ब' वर्गाचा दर्जा देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे या ठिकाणांच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे. शासनाच्या ग्रामविकास विभागाने ५ मार्च २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानुसार कर्जत तालुक्यातील श्री खंडोबा देवस्थान, शेगुड, श्री लालगिर बुवा मठ ट्रस्ट, मांदळी, तसेच श्री क्षेत्र जगदंबा मंदिर देवस्थान, कुलधरण आणि जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान, जवळा या यात्रास्थळांना ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत 'ब'वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे. या दर्जामुळे संबंधित यात्रास्थळांच्या परिसरात मूलभूत सुविधा, रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, सुशोभीकरण यासह इतर विकासकामांसाठी निधी उपलब्ध होणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळणार आहेत. प्रा. राम शिंदे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या धार्मिक स्थळांच्या विकासासाठी शासनस्तरावर महत्त्वाचा निर्णय झाला असून स्थानिक नागरिक व भाविकांमध्ये या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

### सुदामा रेसिडन्सी इमारतीतील १०व्या मजल्यावरील फ्लॅट जळून खाक



**ठाणे, दिवा (स. गांवकरी) :** आज दिनांक ०७/०३/२०२६ रोजी ११:०५ वाजताच्या सुमारास सुदामा रेसिडेन्सी खर्डी गाव, दिवा, ठाणे या ठिकाणी विघ्नहर्ता सोसायटी बी३ विंग (तळ +१५ मजली इमारत) या इमारतीच्या १० व्या मजल्यावरील रूम नंबर १००४ (मालक: अज्ञात, भाडेकरू: श्रीमती. नेहा धावडे) या घरामध्ये आग लागली होती. सदर घटनास्थळी शीळ अग्निशमन केंद्राचे स्थानक अधिकारी श्री. इंगळे सो. व अग्निशमन दलाचे जवान ०१- फायर वाहन व १ रेस्क्यू वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी आगीमध्ये घरामधील कपाट, फ्रिज, एसी सर्व साहित्य व इलेक्ट्रिक वायरिंग जळून नुकसान झाले आहे. सदर घटनास्थळी लागलेली आग अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने दुपारी १:२३ वाजताच्या सुमारास पूर्णपणे विझविण्यात आली आहे. परिस्थिती नियंत्रणात आहे.



### श्री जवळेश्वर देवस्थानला 'ब वर्ग' तिर्थक्षेत्र दर्जा प्राप्त; शासन निर्णय जारी

**जामखेड (स. गांवकरी) :** तालुक्यातील जवळा येथील श्री जवळेश्वर देवस्थानला ' ब ' वर्ग दर्जा प्राप्त झाला आहे. याबाबतचा शासन निर्णय प्रसिध्द झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना ( ब - वर्ग ) अंतर्गत श्री जवळेश्वर देवस्थान या "क" वर्ग ग्रामीण यात्रास्थळाचा "ब" वर्ग दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास २८ फेब्रुवारी रोजी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीच्या बैठकीत छाननी करण्यात आली. प्रस्ताव संदर्भीय शासन निर्णयातील निकषांनुसार परिपूर्ण सादर केला असल्याने, श्री जवळेश्वर देवस्थानास "ब वर्ग " दर्जा देण्याबाबत शिफारस करण्यात आली होती.दरम्यान श्री जवळेश्वर देवस्थानला ब वर्ग दर्जा देण्याबाबतची शिफारस विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी केली होती. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत रितसर प्रस्ताव तयार करण्यात आला होता. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांचे भाविकांच्या संख्येचे प्रमाणपत्र, वनविभागाचे उपवनसंरक्षक यांचे नाहरकत पत्र यासह विविध विभागांच्या पत्रांसह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिका-यांमार्फत सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास राज्य निकष समितीच्या बैठकीत मान्यता मिळाल्यानंतर ब वर्ग दर्जा देणेबाबतचा शासन निर्णय झाला आहे. श्री जवळेश्वर देवस्थानला २० ऑगस्ट २०११ रोजी ' क ' वर्ग दर्जा प्राप्त झाला होता. त्यांनतर आता ब वर्ग दर्जा मिळाल्याने देवस्थानचे महत्व वाढले आहे. तत्कालिन पालकमंत्री प्रा राम शिंदे यांनी सन २०१६ ला पर्यटन विभागामार्फत १ कोटी ५२ लाखांचा निधी मंजूर केला होता. त्यातून रथयात्रामार्ग, सभामंडप, ध्यानमंदिर, रथयात्रामार्ग, मंदिर परिसराचे सुशोभीकरण, परिसरात पेवींग ब्लॉक व व्यापारी संकुल अशी कामे झाली होती.

# बुलडाणा अर्बन फॉरेस्ट हाफ मॅरेथॉन २१ किमी उत्साहात संपन्न

## स्पर्धकांचा दमदार सहभाग

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**

बुलडाणा अर्बन यांच्या वतीने आयोजित २१, १०, आणि ५ किलोमीटर हाफ मॅरेथॉन स्पर्धा आज गिरडा घाट परिसरात मोठ्या उत्साहात पार पडली. या मॅरेथॉनमध्ये तब्बल १००० पेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवत फिटनेस, आरोग्य व सामाजिक जाणीवेचा संदेश दिला. या फॉरेस्ट मॅरेथॉन २१ किलोमीटर दोन्ही १८ ते ४५ वयातील गटांतील प्रथम स्पर्धेत पुरुष मध्ये आकाश बारवाल, गौरव हिवाळे, जीवन भालके, तर महिला गटातून रितू तळमळे,प्रणिता पाटील, रती महाजन, ४५ वयातील पुढील पुरुष व महिला राजेश कोचे, प्रशांत राऊत, अजबराव आखरे, महिला गटातून राधिका दमाणी, डॉ




अनिता राठोड, वैशाली बडगुजर, यांनी प्रथम क्रमांक प्राप्त करून या स्पर्धेवर मोहोर उमटवली.

यावेळी मॅरेथॉन स्पर्धेत १० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेमध्ये

पुरुष व महिला १८ ते ४५ या गटातील विजेते पुढील प्रमाणे आहे. यश पांडे, सागर मोरे,विदेश वाघ, तृप्ती जाधव, सोनाली पाठक, मृणाल पडोसळे, १० किलोमीटर ४६ या पुढील वयातील पुरुष व महिला शरद खिल्लारे, महेश महाजन, संजय तेली , तर महिला अनिता युवराज कापरे, अनुपमा मोटवानी, मंगल गवई आदींनी विजय संपादन केला. गिरडा येथील स्वयंप्रकाश संस्थान येथे सकाळी लवकर बुलडाणा जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांच्या सह बुलडाणा अर्बन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेश झंवर आणि बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ कोमलताई झंवर आ संजय गायकवाड, पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे, नितीन चौधरी गिरडा चे सरपंच श्रीमती सुनिता गायकवाड अनंताभाऊ देशपांडे यांनी मॅरेथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली . या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. तसेच ही स्पर्धा पुर्ण करणाऱ्या सहभागी सर्व धावकांना बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने पदके देण्यात आली.

स्पर्धेला मदत करणाऱ्या सर्व पंच व अधिकाऱ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे देण्यात आले.तसेच स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी ज्यांनी परिश्रम घेतले अशा सर्वांचा सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी धावकांसाठी बुलडाणा अर्बन संस्थेच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. धावनपथावर ठिकठिकाणी पाणी,फळे, बिस्किटे यांचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रथमच गिरडा येथे अतिशय सुंदर अशा या फॉरेस्ट मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.धावकांनी या दरम्यान पर्यटनाचा सुध्दा आस्वाद घेतला. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक व समारोप बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेश झंवर यांनी केले. या कार्यक्रमाला क्रिडाप्रेमी व गिरडा वासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेदरम्यान स्वयंसेवक, वैद्यकीय पथक व पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवत कार्यक्रम यशस्वी केला. मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांचे आयोजकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.यशस्वी आयोजना बद्दल ज्ञानगंगा फॉरेस्ट रणर ग्रुप, रणरागिणी रनिंग ग्रुप तसेच सहभागी स्पर्धकांनीही समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.एकूणच बुलडाणा अर्बनच्या या 21 किमी हाफ मॅरेथॉनने शहरात आरोग्य, फिटनेस आणि उत्साहाची लाट निर्माण केली असून युवकांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. सदर स्पर्धेसाठी बुलडाणा अर्बन संस्थेचे कर्मचारी, सहकार विद्या मंदिर चे विद्यार्थी व शिक्षकोत्तर कर्मचारी आणि ज्ञानगंगा फॉरेस्ट रणर ग्रुप व रणरागिणी रनिंग ग्रुप यांच्या अथक परिश्रमातून यशस्वी करण्यात आला.

# आनंद नगर येथील धर्मवीर आनंद दिघेसाहेब चौकाचे लोकार्पण



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आनंद नगर येथील धर्मवीर आनंद दिघेसाहेब चौक सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (06 मार्च) उत्साहात संपन्न झाला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते या चौकाचे लोकार्पण करण्यात आले असून महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, स्थानिक नगरसेविका अनिता ठाकूर, उपअभियंता सुदर्शन मोरे, कार्यकारी अभियंता संजय कदम तसेच महापालिकेचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. आनंद नगर येथील ग्रँड स्क्वेअर सोसायटी जवळ हा चौक असून सुशोभीकरणामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यास मदत झाली असून हा परिसर नागरिकांना आकर्षित करत आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून या चौकांचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. नागरिकांना आकर्षित होतील अशा पध्दतीने या चौकाचे सुशोभिकरण करण्यात आले असून मधोमध छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा ठेवण्यात आली असून हे पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

# महिला उद्योजकता स्टॉलच्या माध्यमातून महिलांसाठी खुले व्यासपीठच

## धनश्री ताई विखे पाटील

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्वकुळसाळी हित संवर्धक महिला मंडळाच्या वतीने यशस्विता प्रदर्शनाचे माध्यमातून बचत गटातील महिलांना स्टॉल लावण्यासाठी व्यासपीठ खुले केले आहे. महिलांसाठी आयोजित या उपक्रमामुळे व्यवसाय करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन मिळत आहे.

या स्टॉलला महिलांनी मोठ्या संख्येने भेट देऊन खरेदी करावी. आपल्या शहरातील महिलांचा व्यवसाय मोठा झाला तर त्या महिलांमूळे आपल्या गावाचे नाव देखील मोठे होईल.व्यवसाय करताना महिला ही महिलांना सोबत घेऊन उद्योजकता व्यवसायात कार्य करीत असते.महिला उद्योजकता स्टॉलच्या माध्यमातून महिलांसाठी खुले व्यासपीठच निर्माण झाले आहे. असे प्रतिपादन रणरागिनी महिला मंडळाचे अध्यक्षा धनश्रीताई विखे पाटील यांनी केले आहे. दिल्लीगेट पटांगण येथे जागतिक महिला दिनानिमित्त स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ संचलित महिला मंडळ आयोजित महिला उद्योजकता व सक्षमीकरणासाठी यशस्विता प्रदर्शनाचे उद्‌घाटन रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा



धनश्रीताई विखे पाटील,महापौर ज्योतीताई गाडे,उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका मयुरी जाधव, सुप्रिया जाधव,भाजपचे अध्यक्ष प्रियाताई जानवे,गीता गिल्डा, ज्योती दांडगे,उज्वला भांगे, अहिल्यानगर जिल्हा ब्युटीशियन असोसिएशनचे अध्यक्षा सौ. अनुजा कांबळे,ऋतुजा धोत्रे, जयश्री सुळ,वनिता मानकर, महावीर ग्रुप चे संचालक राजूशेठ भंडारी, स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक,कार्याध्यक्ष लक्ष्मीकांत तरोटे ,खजिनदार गजेंद्र सोनवणे,संस्कृती श्रीनिवास कनोरे शाळेचे चेअरमन जितेंद्र लांडगे,सचिव संजय सागावकर, प्रवीण झिंजे,अभिजीत अष्टेकर,कृष्णा बागडे,योगेश पांढरपोटे उमेश कोंदे,प्रदीप दळवी,संजय दळवी,किशोर विंचुरकर आदी उपस्थित होते. महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या,या प्रदर्शनामध्ये महिलांनी हस्तकला,पापड, मसाले,लोणचे आदींसह कपडे खाद्यपदार्थांचे उत्तम स्टॉल कलाकुसरीने लावण्यात आले आहे. यामुळे महिलांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. महिलांना या प्रदर्शनाच्या माध्यमातून व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.सकुळसाळी हितसंवर्धक महिला मंडळाचे कार्य कौतुकास्पद आहे.सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या खूप शुभेच्छा. उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, महिला सबलीकरणासाठी शासनाच्या वतीने वेगवेगळे पाऊल उचलले जात आहे. नामदार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहे.महिला उद्योजकांना महापालिकेच्या माध्यमातून नेहमीच सहकार्य केले जाईल.

गेल्या पंचवीस वर्षापासून स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम समाजासाठी राबविले जातात. स्टॉलच्या माध्यमातून महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळत आहे.यापुढील काळातही महिलांसाठी समाजाने असे उपक्रम राबवावेत. सौ.अनुजा कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रामदास गर्जे यांनी केले.तर आभार वनिता मानकर यांनी मानले.

# गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सल्फ्युरिक ॲसिड प्लांट-३ राष्ट्राला समर्पित

**परादीप, ओडिशा : (समर्थ गांवकरी)**

Amit Shah यांनी आज Indian Farmers Fertiliser Cooperative Limited (IFFCO) च्या परादीप युनिटमधील नव्याने उभारण्यात आलेल्या सल्फ्युरिक ॲसिड प्लांट-३ (SAP-III) चे राष्ट्राला समर्पण केले. या प्रकल्पाच्या कार्यान्वयनामुळे भारताच्या खत उत्पादन पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार असून देशातील शेतकरी समुदायाला मोठा फायदा होणार आहे. सुमारे ७०० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या सल्फ्युरिक ॲसिड प्रकल्पाची दैनंदिन उत्पादन क्षमता सुमारे २,००० मेट्रिक टन




इतकी आहे. या प्रकल्पामुळे परादीप संकुलाची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून हे संकुल भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक फॉस्फेटिक खत उत्पादन केंद्रांपैकी एक आहे.

या समर्पण सोहळ्यास Mohan Charan Majhi, Dharmendra Pradhan, Dilip Sanghani, K. J. Patel यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच संसद सदस्य, राज्यातील मंत्री, भारत सरकार आणि ओडिशा सरकारचे वरिष्ठ अधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी बोलताना Amit Shah यांनी भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात सहकार क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, IFFCO सारख्या संस्थांनी देशभरातील लाखो शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यात मोठे योगदान दिले आहे. भारत सरकार सहकार चळवळ अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आणि शेती अधिक आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करेल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खत उत्पादन पायाभूत सुविधा वाढवल्यास शेतकऱ्यांना आवश्यक कृषी घटक वेळेवर उपलब्ध होतील आणि कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढेल. यावेळी Mohan Charan Majhi यांनी सांगितले की, परादीप येथे नव्या प्रकल्पाच्या सुरूवातीमुळे राज्यातील औद्योगिक विकासाला गती मिळेल. ओडिशा हे औद्योगिक केंद्र म्हणून पुढे येत असून अशा मोठ्या प्रकल्पांमुळे गुंतवणूक वाढण्यासह स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. तर Dharmendra Pradhan यांनी सांगितले की, IFFCO च्या परादीप संकुलाच्या विस्तारामुळे देशाची खत उत्पादन क्षमता अधिक मजबूत होईल. शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध होणे हे कृषी विकास टिकवून ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. IFFCO चे अध्यक्ष Dilip Sanghani यांनी सांगितले की, IFFCO नेहमीच शेतकऱ्यांची सेवा आणि सहकार चळवळीला बळकटी देण्याच्या उद्देशाने काम करत आहे. सल्फ्युरिक ॲसिड प्लांट-३ चे उद्‌घाटन हे उत्पादन क्षमता वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या IFFCO च्या बांधिलकीचे प्रतीक आहे. IFFCO चे व्यवस्थापकीय संचालक K. J. Patel यांनी या प्रकल्पाबाबत तांत्रिक माहिती देताना सांगितले की, हा प्रकल्प अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरून उभारण्यात आला आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मुद्रित माध्यमांची विश्वासार्हता व महत्त्व अबाधित

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील : राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**



मुद्रित माध्यमांची विश्वासार्हता व महत्त्व आजही अबाधित असून, शासन मुद्रित माध्यमांतील वृत्तांची नेहमीच अतिशय गांभीर्याने दखल घेते. २० ते २५ वर्षे सेवा देऊनही उपेक्षित राहिलेल्या, नोकरीचे स्थैर्य नसलेल्या जिल्हा व ग्रामीण पातळीवरील पत्रकारांना अधिस्वीकृती समितीच्या माध्यमातून निश्चित न्याय मिळेल, असा विश्वास राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र व प्रसार माध्यम अधिस्वीकृती समितीच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय बैठकीचा शुभारंभ आज शिर्डी येथे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माहिती संचालक तथा समितीचे सदस्य सचिव डॉ. गणेश मुळे, शिर्डी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, समिती सदस्य नाशिक विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे आदी उपस्थित होते. डॉ. विखे पाटील म्हणाले, सध्याच्या बदलत्या प्रवाहात सोशल मीडिया व डिजिटल माध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर वाढत आहे; तरीही मुद्रित माध्यमांचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी अधिस्वीकृती समिती करत असलेल्या प्रयत्नाचे त्यांनी विशेष कौतुक केले. पत्रकारांचे निवृत्तीवेतन, त्यांचे स्थैर्य आणि त्यांच्यावरील व्यावसायिक दबाव यांसारख्या अत्यंत कळीच्या प्रश्नांवर समितीच्या शिफारशींनुसार शासन निश्चितच सकारात्मक पावले उचलेल, अशी ग्वाही देत त्यांनी समितीच्या कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी आपल्या मनोगतात विखे कुटुंबीयांच्या राजकीय व संस्थात्मक कार्याचा गौरव केला. या आदर्श कार्यपद्धतीवर आधारित मार्गदर्शक 'संदर्भ ग्रंथ' तयार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. समितीच्या कामकाजाबाबत माहिती देतांना ते म्हणाले, राज्यभरातील सुमारे सव्वातीन हजार पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देण्याची कार्यवाही समितीमार्फत केली जाते. तथापि, समितीचे काम केवळ पत्रिका मंजुरीपुरते मर्यादित नसून, विविध वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे व पत्रकार संघटनांच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून 'पत्रकारांचे कल्याण साध्य करणे' हे समितीचे प्रमुख ध्येय आहे. पत्रकारांच्या हितासाठी शासनाकडे योग्य शिफारशी करून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी भविष्यातही सर्वांचे सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री.गाडीलकर यांनी यावेळी साईबाबा संस्थानच्या सेवाभावी कार्य व उपक्रमांविषयी माहिती दिली.

---

सातही IISER मधील प्रवेश केवळ IAT गुणांच्या आधारे निश्चित केला जाईल; JEE गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाणार नाही.

# IISER ॲप्टिट्यूड टेस्ट (IAT) २०२६ नोंदणी ५ मार्चपासून सुरू; परीक्षा ७ जून रोजी नियोजित

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISERs) द्वारे 'IISER ॲप्टिट्यूड टेस्ट' (IAT) 2026 साठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी सर्व IISER कॅम्पसमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी ही एकमेव आणि अनिवार्य प्रवेश परीक्षा आहे. ऑनलाइन अर्ज प्रक्रिया 5 मार्च 2026 (गुरुवार) पासून सुरू होईल आणि ही कलचाचणी (Aptitude Test) 7 जून 2026 (रविवार) रोजी घेतली जाईल. विज्ञानाची ओढ असणारे विद्यार्थी आता या महत्त्वाच्या परीक्षेसाठी नोंदणी करू शकतात, ज्याद्वारे सातही IISER कॅम्पसमध्ये जागतिक दर्जाच्या संशोधन प्रशिक्षणाचे दरवाजे उघडले जातील. 'IISER' या भारत




सरकारद्वारे स्थापित केलेल्या प्रमुख स्वायत्त संस्था असून, उच्च दर्जाचे मूलभूत विज्ञान शिक्षण आणि संशोधनाला चालना देणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. IISER बरहमपूर, IISER भोपाळ, IISER कोलकाता, IISER मोहाली, IISER पुणे, IISER तिरुवनंतपुरम आणि IISER तिरुपती यांसह सर्व IISERमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना https://www.iiseradmission.in/ या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन IAT 2026 साठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वेबसाइटवर परीक्षा केंद्रांची माहिती देखील उपलब्ध असेल. IAT 2026 प्रवेश प्रक्रियेदरम्यान उमेदवारांना मदत करण्यासाठी एक मदत कक्ष (Helpdesk) स्थापन करण्यात आला आहे: फोन: +91 7205457461 (कामाच्या दिवशी दुपारी 2 ते 5 या वेळेत). ईमेल: askjac2026@iiserbpr.ac.in.

प्रो. सुनील एस. भागवत, संचालक, IISER पुणे, म्हणाले, "जगातील सर्वोत्तम विद्यापीठांच्या तोडीची पायाभूत सुविधा आणि अत्याधुनिक संशोधनात सक्रिय असलेले प्राध्यापक लाभलेले IISER पुणे, सर्वोत्तम विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी एक आदर्श वातावरण प्रदान करते.

---

# प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी येथे NQAS राज्यस्तरीय मूल्यांकन संपन्न

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधी (ता. उमरी, जि. नांदेड) येथे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक (NQAS) अंतर्गत राज्यस्तरीय मूल्यांकन प्रक्रिया नुकतीच उत्साहात पार पडली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या पूर्वतयारीबद्दल आणि आरोग्य केंद्राच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल मूल्यांकन समितीने विशेष समाधान व्यक्त केले आहे.

प्रमुख उपस्थितांची उपस्थिती

या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय समितीचे प्रतिनिधी म्हणून डॉ. सुहास वाहूळे (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय मालेगाव, वाशिम) आणि डॉ. वसुंधरा खैरे (दक्षता मेंटर, जिल्हा हिंगोली) यांनी उपस्थित राहून केंद्रातील विविध विभागांची बारकाईने पाहणी केली.

* प्रशासकीय मार्गदर्शन: हे मूल्यांकन यशस्वी करण्यासाठी डॉ. संगीता देशमुख आणि डॉ. संजय पेरके यांनी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन व सहकार्य केले.
* लक्ष्य २०२६: शासनाच्या उद्दिष्टानुसार डिसेंबर २०२६ पर्यंत ५० टक्के उपकेंद्रे आणि ७५ टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रे NQAS मानांकित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
* स्थानिक टीमचे प्रयत्न: तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन देवराई, डॉ. सोहेल, आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सिंधीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हमंद यांच्यासह सर्व आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका मूल्यांकनावेळी उपस्थित होते.
* समन्वय: जिल्हा परिषदेचे जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक (DQAC) डॉ. शामसुंदर लोखंडे यांनी या संपूर्ण प्रक्रियेत समन्वयक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.

सिंधी आरोग्य केंद्रात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सेवा, स्वच्छता, दप्तर तपासणी आणि तांत्रिक बाबींची पूर्तता पाहून समितीने सकारात्मक दाद दिली आहे. या मूल्यांकनामुळे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार असून, नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

---

# १०० स्टॉलची उभारणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

कृषि विभाग व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२६" चे आयोजन १५ ते १७ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. हा महोत्सव सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समिती मैदान, नवा मोंढा, नांदेड येथे होणार आहे. हा महोत्सव नांदेड शहरवासीयांसाठी एक प्रकारची मेजवानी असून नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतमालाची खरेदी करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. या कृषी महोत्सवात कृषी प्रदर्शन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांचे स्टॉल, विविध कृषी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक तसेच कृषी संलग्न शासकीय विभागांचे स्टॉल असे एकूण १०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत.

---

# राजपुताना स्टेनलेस लिमिटेडचा २५५ कोटी रुपयांचा आयपीओ ९ मार्चपासून खुला





**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

स्टेनलेस स्टील उत्पादन क्षेत्रातील आघाडीची कंपनी राजपुताना स्टेनलेस लिमिटेड सुमारे २५४.९८ कोटी रुपयांचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (IPO) घेऊन भांडवली बाजारात प्रवेश करत आहे. हा आयपीओ ९ मार्च २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होणार असून ११ मार्च २०२६ रोजी बंद होईल. कंपनीने प्रति शेअर ११६ ते १२२ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. गुंतवणूकदारांना किमान ११० शेअर्स आणि त्याच्या पटीत अर्ज करता येणार आहे. किरकोळ गुंतवणूकदारांसाठी किमान गुंतवणूक सुमारे १३,४२० रुपये असेल. शेअर्सचे वाटप १२ मार्च रोजी होण्याची शक्यता असून १६ मार्च २०२६ रोजी हे शेअर्स बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याची अपेक्षा आहे. या आयपीओसाठी निर्भय कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड हे बुक रनिंग लीड मॅनेजर असून केफिन टेक्नॉलॉजी लिमिटेड रजिस्ट्रार म्हणून काम पाहत आहे. २५५ कोटी रुपयांच्या या सार्वजनिक इश्यूमध्ये १७८.७३ कोटी रुपयांचे १.४७ कोटी शेअर्स फ्रेश इश्यू म्हणून जारी केले जातील, तर ७६.२५ कोटी रुपयांचे शेअर्स ऑफर फॉर सेल (OFS) अंतर्गत प्रमोटर्सकडून विकले जातील. कंपनी या निधीचा वापर व्यवसाय विस्तारासाठी करणार आहे. यामध्ये स्टेनलेस स्टील सीमलेस पाईप्ससाठी नवीन उत्पादन युनिट उभारण्यासाठी १८.५७ कोटी रुपयांची गुंतवणूक तसेच ९८ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज कमी करण्यासाठी निधीचा वापर केला जाणार आहे. १९९१ मध्ये स्थापन झालेली राजपुताना स्टेनलेस लिमिटेड ही स्टेनलेस स्टीलच्या लांब आणि सपाट उत्पादनांमध्ये अनुभवी कंपनी आहे. गुजरातमधील कलोल येथे ३५,१९६ चौरस मीटर परिसरात तिचे आधुनिक उत्पादन युनिट असून त्यात इंडक्शन फर्नेस, एओडी, सीसीएम आणि रोलिंग मिलसारख्या अत्याधुनिक सुविधा आहेत. कंपनी आरएसएल (RSL) या ब्रँडअंतर्गत बिलेट्स, फोर्जिंग इनगॉट्स, रोल्ड ब्लॉक बार, रोल्ड ब्राइट बार, फ्लॅट्स, कॉइल्स यांसह विविध स्टेनलेस स्टील उत्पादने तयार करते. ही उत्पादने ८० हून अधिक स्टेनलेस स्टील ग्रेडमध्ये उपलब्ध असून सीमलेस पाईप्स, फोर्जिंग, अभियांत्रिकी, कास्टिंग, फास्टनर्स, पंप, शाफ्ट आणि ऑटोमोटिव्ह उद्योगांमध्ये वापरली जातात.

**जागतिक बाजारपेठेत उपस्थिती**

भारतीय बाजारपेठेसोबतच कंपनी अमेरिका, यूएई, तुर्की, कुवेत आणि पोलंड यांसारख्या देशांमध्येही निर्यात करते. एरोस्पेस, संरक्षण, ऑटोमोटिव्ह, विमानचालन आणि तेल-वायू क्षेत्रांमध्ये तिच्या उत्पादनांचा कच्चा माल म्हणून वापर होतो. सप्टेंबर २०२५ पर्यंत कंपनीमध्ये ४०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

---

# महिला सक्षमीकरणासाठी काम करणार - सुनीता सोबले

- पारनेर शहरातील सोबलेवाडी येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम
- खेळ पैठणीचा' कार्यक्रमात जयश्री शेरकर यांना इलेक्ट्रिक स्कुटी

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



ग्रामीण आणि दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारनेरमधील महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी 'होम मिनिस्टर: खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. केवळ मनोरंजनच नव्हे, तर आगामी काळात महिलांच्या समस्या सोडवून त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि प्रोत्साहनासाठी मी कटिबद्ध राहीन," असा विश्वास सामाजिक कार्यकर्त्या व जय जिजाऊ बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुनीता सोबले यांनी व्यक्त केला.

पारनेर शहरातील सोबलेवाडी येथे महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सुनीता सोबले यांच्या पुढाकाराने आणि 'क्रांती नाना माळेगावकर' यांच्या सादरीकरणाने या रंगतदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य राणीताई लंके यांच्या हस्ते व पारनेर नगरपंचायतीच्या महिला पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्या योगिता औटी, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, माजी उपनगराध्यक्षा सुरेखा भालेकर, कान्हूर पठारच्या सरपंच संध्या ठुबे, शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख प्रियंका खिलारी यांच्यासह नीता ठुबे, प्रियंका औटी, गायत्री सोनवणे, अंकिता शेळके यांसारख्या अनेक मान्यवर महिला उपस्थित होत्या.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांना विविध आकर्षक बक्षिसे देण्यात आली. यामध्ये जयश्री शेरकर यांनी प्रथम क्रमांकाची इलेक्ट्रिक स्कुटी जिंकली. अन्य विजेत्या महिला पुढीलप्रमाणे: संगीता सोबले(फ्रिज) पूजा शेरकर (शिलाई मशीन) अनिता शेरकर (सोन्याची नथ) जिजाबाई शेरकर (प्रेशर कुकर) रागिनी बुगे (पिठाची गिरणी) सविता थोरात व मनीषा थोरात (मोबाईल फोन ) तसेच राजश्री खताळ (एलईडी स्मार्ट टीव्ही), सुवर्णा सोबले (गॅस), ताराबाई सोबले (टेबल फॅन) आणि सुनीता सोबले यांना चांदीचा छल्ला देऊन गौरविण्यात आले. उपस्थित प्रत्येक महिलेला सन्मानपूर्वक पैठणी भेट देण्यात आली.

सोबलेवाडी येथे महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांच्या खेळ पैठणीच्या कार्यक्रमांमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित'दादा पवार यांच्या स्मृतींना कार्यक्रमात मान्यवर व पारनेर शहराच्या नगराध्यक्षा उपनगराध्यक्ष व नगरसेविका यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले व त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**नियोजन आणि यश**

सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांनी पारनेर येथे आयोजित खेळ पैठणीचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हनुमान तरुण मित्र मंडळ (सोबलेवाडी,पारनेर), सुनीताताई सोबले युवा मंच आणि जय जिजाऊ बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. पारनेरमधील महिलांना दिलेली ही अनोखी भेट तालुक्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

---

# सह्याद्री व्हॅली इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पुणे विद्यापीठ 'गुणवत्ता सुधार योजने' अंतर्गत संशोधन कार्यशाळा संपन्न

**राजुरी : (समर्थ गांवकरी)**



सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, राजुरी येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'गुणवत्ता सुधार योजने' (QIP) २०२५-२६ अंतर्गत "Cutting Edge Research and Innovation" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. सुरुवात विद्यापीठ गीताने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार सचिन चव्हाण सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर अकॅडमिक डीन प्रा. पी. बालरामुडू सर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून संशोधनाचे महत्त्व आणि शैक्षणिक प्रगतीवर मोलाचे मार्गदर्शन केले. विद्या प्रतिष्ठान, बारामती येथील डॉ. चैतन्य कुलकर्णी आणि प्रा. प्रदीप घोरपडे यांनी 'रिसोर्स पर्सन' म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता, पेटंट फाइलिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानावर सखोल मार्गदर्शन केले.

या प्रसंगी सल्लागार समितीतील विभाग प्रमुख डॉ. मनोज कुमार , प्रा. रांधवण भागवत , प्रा. रेड्डी मणिकंठा , प्रा. खताळ कविता , प्रा. राहणे दिव्या प्रा. खेमनार कविता आणि प्रा.उद्धव भारती उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी समन्वयक प्रा. नांगरे वैभव, प्रा. नलावडे तेजस आणि सह-समन्वयक प्रा. गाढवे गौरव प्रा. रुपेश कांबळे प्रा. नेहे यश यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व संशोधकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला असून, सहभागींना प्रमाणपत्रांचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

---

# गाडविहीर गावात सेवा सेतु कार्यक्रमाचे आयोजन

**डांग, गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील गाडविहीर गावात आज सेवा सेतु कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक नागरिकांच्या मागणीचा विचार करून तसेच सीमावर्ती भागातील लोकांना विविध सरकारी योजना आणि सेवांचा लाभ सहजपणे मिळावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रांत अधिकारी, तालुका पंचायतचे अध्यक्ष श्री सुरेशभाई चौधरी, मामलतदार तसेच तालुका विकास अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच कडमाळ, गाडविहीर, मोरझीरा आणि गडद या गावांचे सरपंचही कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मोठ्या संख्येने स्थानिक लाभार्थी उपस्थित राहिले आणि विविध सरकारी योजनांची माहिती घेऊन आवश्यक सेवांचा लाभ घेतला. सेवा सेतु कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांची कामे घरबसल्या आणि सुलभ पद्धतीने पूर्ण व्हावीत हा सरकारचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले असून सरकारी सेवा आता गावपातळीवर उपलब्ध होत असल्याची भावना लाभार्थ्यांनी व्यक्त केली.

---

# "उत्साह आणि श्रद्धा – हीच आपल्या परंपरेची ताकद!" : उद्योजक मंगेश दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



शनिवार दि. ७ मार्च २०२६ निघोज गावातील ढवणवाडी येथील श्री चैतन्य कानिफनाथ महाराज ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त मढी येथून पवित्र ज्योत आणण्यासाठी निघालेल्या शेकडो भाविक कार्यकर्त्यांचा पारनेर शहरातील आमदार काशिनाथ दाते सर जनसंपर्क कार्यालयात सन्मान करण्यात आला. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात आमदार दाते सरांच्या वतीने उद्योजक मंगेश काशिनाथ दाते यांनी उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचा सत्कार करून पुढील धार्मिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत यथोचित सन्मान केला. यावेळी उद्योजक राजेंद्र औटी, सुनिल गाडगे, कार्याध्यक्ष रमेश वरखडे, वसंत ढवन, मच्छिंद्र लाळगे, संकेत ढवण, वेदांत ढवण, सुदाम ढवण, शंकर ढवण, दिपक ढवण, संदीप ढवण, दिलीप वरखडे, गणेश ढवण, युवराज ढवण, निखील ढवण, शुभम ढवण, संतोष ढवण, अमोल एरंडे, विष्णु ढवण, विनायक ढवण, नवनाथ ढवण, सुनिल ढवण, संपत ढवण, आदिनाथ ढवण, शंकर ढवण, राजू ढवण, वसंत ढवण, किरण वरखडे, तुषार ढवण, सोमनाथ ढवण, तुषार घुले, आकाश चव्हाण, प्रविण कोठावळे, मंगेश ढवण, भास्कर ढवण, आकाश ढवण यांसह श्री चैतन्य कानिफनाथ महाराज ट्रस्ट ढवनवाडीचे शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंगेश दाते म्हणाले, निघोज आणि धार्मिकतेचे एक अतूट नाते असून माता मळगंगेची पावन भूमी असलेल्या निघोज नगरीतील ढवणवाडीच्या चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या यात्रेला आणि या परंपरेला परिसरातील भाविकांमध्ये मोठे आध्यात्मिक महत्त्व आहे.

वर्षानुवर्ष हि अनमोल धार्मिक परंपरा जपण्यासाठी कार्य करणाऱ्या मंडळांच्या कार्यकर्त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळातही या ट्रस्ट व मंडळाच्या सर्व उपक्रमांना आमदार काशिनाथ दाते सरांच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. निघोज येथील ढवणवाडीमध्ये आयोजित चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सव धार्मिक वातावरणात साजरा होत असून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मढी येथे जाऊन ज्योत आणण्याच्या या पारंपरिक सोहळ्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आमदार काशिनाथ दाते यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या स्वागतामुळे भाविकांचा उत्साह अधिक वाढल्याचे त्यांनी सांगितले.

धार्मिक परंपरा जपणाऱ्या अशा उपक्रमांना आमदार दाते सर नेहमीच प्रोत्साहन देत असतात. मढी येथून ज्योत आणण्यासाठी निघालेल्या ढवणवाडी - निघोज येथील भाविकांचा आमदार महोदयांच्या अनुपस्थितीतही करण्यात आलेला सन्मान हा जनतेशी असलेले आमदार दाते सरांचे नाते अधिक दृढ करणारा असून पुढील काळातही अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांना आमदार दाते सरांच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य मिळेल, असा विश्वास नेहमी वाटतो.

> पारनेर येथील जनसंपर्क कार्यालयात आम्हा सर्व कार्यकर्त्यांचा करण्यात आलेला सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी असून तालुक्याच्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून देण्यात आलेल्या अशा प्रकारच्या पाठबळामुळे धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यास सर्व युवा सहकाऱ्यांना अधिक उत्साह मिळतो. तसेच आमदार दाते सर आणि उद्योजक मंगेश दाते यांनी दिलेल्या शुभेच्छांबद्दल मी सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांनी कृतज्ञता व्यक्त करतो.
> **- गणेश भास्कर ढवण**

# घर आणि विश्व दोन्ही समर्थपणे सांभाळणारी स्त्रीशक्ती



(समर्थ गांवकरी)

■ अलका पाटील ■
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय नांदेड

आजचा काळ हा स्त्रीशक्तीच्या नव्या उभारणीचा काळ मानला जातो. समाजातील अनेक रूढी, परंपरा आणि मर्यादा ओलांडत आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. पूर्वी स्त्रीची भूमिका केवळ घरापुरती मर्यादित मानली जात होती; परंतु शिक्षण, आत्मविश्वास आणि संधी मिळाल्यामुळे आज स्त्री समाजाच्या सर्व क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहे. आज भारतासह जगभरात स्त्रियांनी अनेक उच्च पदांवर काम करत इतिहास घडवला आहे. राष्ट्रपती पदापासून अंतराळवीरांपर्यंत, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, क्रीडापटू, कलाकार आणि राजकारणी अशा अनेक क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. अंतराळ संशोधन, संरक्षण क्षेत्र, तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा अशा आव्हानात्मक क्षेत्रांमध्येही महिलांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यामुळे आजची स्त्री पुरुषांच्या तुलनेत कुठल्याही बाबतीत कमी नाही, हे समाजाने मान्य केले आहे.

स्त्रीच्या कर्तृत्वाचा गौरव केवळ महिला दिनापुरता मर्यादित ठेवणे योग्य नाही. वर्षातील सर्व ३६५ दिवस तिच्या कष्टांचा आणि योगदानाचा सन्मान व्हायला हवा. कारण स्त्रीचे आयुष्य हे सततच्या जबाबदाऱ्यांनी व्यापलेले असते. ती आई, पत्नी, मुलगी, बहीण अशा अनेक नात्यांतून कुटुंबाची जपणूक करत असते. तिच्या त्यागामुळे आणि परिश्रमामुळेच कुटुंबाची आणि समाजाची घडी व्यवस्थित बसते. कुटुंबाच्या जडणघडणीत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुलांना चांगले संस्कार देणे, कुटुंबातील सदस्यांची काळजी घेणे, घरातील आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थापन सांभाळणे या अनेक जबाबदाऱ्या ती समर्पणाने पार पाडते. विशेष म्हणजे आज अनेक महिला नोकरी किंवा व्यवसाय करत असतानाही घरातील जबाबदाऱ्या तितक्याच समर्थपणे सांभाळतात. त्यामुळे घर आणि बाहेर अशा दोन्ही आघाड्यांवर ती समतोल राखताना दिसते.

ग्रामीण भागातही महिलांची भूमिका दिवसेंदिवस अधिक प्रभावी होत आहे. शेतीकामात पुरुषांबरोबर महिलाही खांद्याला खांदा लावून काम करतात. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी आर्थिक स्वावलंबन मिळवले आहे. विविध लघुउद्योग, हस्तकला, अन्नप्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय अशा क्षेत्रांमध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे आणि त्यांची दृष्टीही व्यापक झाली आहे. आज डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक, पत्रकार अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासात स्त्रियांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. कारण स्त्री सक्षम झाली तर कुटुंब, समाज आणि राष्ट्रही सक्षम होते.

तथापि, आजही काही ठिकाणी महिलांना सामाजिक असमानता, भेदभाव किंवा अन्यायाचा सामना करावा लागतो. त्यामुळे महिलांना समान संधी, सुरक्षित वातावरण आणि सन्मान मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. महिलांच्या शिक्षणाला, आरोग्याला आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन दिल्यास समाज अधिक प्रगत आणि समतोल होऊ शकतो.

एकूणच, स्त्री ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नसून समाजाच्या प्रगतीची प्रेरणाशक्ती आहे. तिच्या कष्टांचा, त्यागाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान केवळ एका दिवसापुरता न ठेवता प्रत्येक दिवशी करणे आवश्यक आहे. स्त्रीला समान संधी आणि सन्मान देणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत समाज ठरतो. स्त्रीशक्तीचा सन्मान आणि सशक्तीकरण हेच उज्ज्वल भविष्याचे खरे आधारस्तंभ आहेत.

# मेळघाटात 'जुनी बाई'

## जंगलात आयुष्य रुजलेल्या अंगणवाडी सेविकेची भावस्पर्शी कहाणी

(समर्थ गांवकरी)

**मेळघाटात नोकरी म्हणजे अनेक शासकीय कर्मचाऱ्यांसाठी मोठं आव्हान आणि संकट मानलं जातं. घनदाट जंगल, दुर्गम रस्ते, मुलभूत सुविधांचा अभाव आणि कठीण जीवनमान या सगळ्यांमुळं अनेक जण येथे बदली टाळण्याचा प्रयत्न करतात. मात्र, या सगळ्या परिस्थितीतही मेळघाटातील अति दुर्गम भागात वसलेल्या जारीदा गावाशी आयुष्यभराचं नातं जोडणाऱ्या गुंफा बाजीराव नेरकर यांची कहाणी मात्र वेगळीच आहे. जारीदा गावात 'जुनी बाई' अशी त्यांची ओळख.**



### अंगणवाडी सेविका म्हणून कसे केलं कार्य

- 1982 मध्ये 125 रुपयांच्या पगारावर अंगणवाडी सेविका म्हणून कामाची सुरुवात
- 37 वर्षांची सेवा, 2018 मध्ये सेवानिवृत्ती
- तब्बल 44 वर्षांपासून जारीदा गावात वास्तव्य

44 वर्षांपासून वास्तव्य - मूळ अमरावतीच्या रहिवासी असणाऱ्या गुंफा नेरकर यांना 1982 साली मेळघाटात चिखलदरा तालुक्यात येणाऱ्या जारीदा या अतिदुर्गम गावात अंगणवाडी सेविका म्हणून कामाची संधी मिळाली. 1982 साली अंगणवाडी सेविका म्हणून गावात आलेल्या गुंफाबाई आजही त्या गावातच राहतात. तब्बल 37 वर्षे अंगणवाडी सेविका म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. 2018 मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्यानंतरही गावाशी असलेली त्यांची नाळ तुटलेली नाही. गेल्या 44 वर्षांपासून गुंफाबाई या जारीदा गावातच राहतात.

जुनी बाई ही नवी ओळख - जारीदा या गावात 44 वर्षांपासून राहणाऱ्या गुंफाबाई नेरकर यांना त्यांच्या नावानं कोणी ओळखत नाही. प्रत्येकाच्या तोंडी एकच नाव आहे ते म्हणजे जुनी अंगणवाडी बाई. गावाबाहेरून येणाऱ्या कोणी नेरकर बाई कुठे राहतात, असं विचारलं तर उत्तर मिळत नाही. पण जुनी बाई कुठे राहतात असं विचारताच गावकरी लगेच घर दाखवतात. जुनी बाई ही ओळख गुंफाबाई नेरकर यांच्या आयुष्याची खरी कमाई ठरली आहे.

दुर्गम गावात संघर्षमय सुरुवात - "1982 साली अंगणवाडी सेविका म्हणून मी जारीदा गावात आले. तेव्हा गावात वीज नव्हती, रस्ता नव्हता, दळणाचीही सुविधा नव्हती. अंगणवाडी सेविका म्हणून त्यावेळी 125 रुपये पगार मिळायचा. गावात पिठाची चक्की नसल्यामुळं 5 किलोमीटर दूर जाऊन धान्य दळावं लागायचं. कधी अमरावतीला जायचं असेल तर 10 किलोमीटर पायी चालत मध्य प्रदेशातील भैसदेयी येथे जावं लागायचं. तिथून बस मिळायची. कधी वन विभागाच्या लाकडाच्या ट्रकमध्ये बसून तर कधी छकड्यातून प्रवास करून भैसदेयी हे शहर गाठावं लागायचं. वनविभागाचे ट्रक अनेकदा सेमाडोह मार्गे परतवाडा जायचे. तो प्रवास फारच लांबचा होता, त्या प्रवासाचादेखील अनुभव मी घेतला", असं गुंफाबाई नेरकर ईटीव्ही भारतशी बोलताना म्हणाल्या. " त्यावेळी रात्री उजेडासाठी गावात रॉकेलही नसायचं. लाकूड पेटूनच उजेड केला जायचा. स्वयंपाकही लाकडावरच व्हायचा. या गावकऱ्यांसारखंच जीवन जगत या वातावरणात मी मिसळून गेले", असं गुंफाबाई म्हणतात.

लसीकरणाच्या भीतीनं घराची दारं व्हायची बंद- "त्या काळात गावातील आदिवासी कुटुंबांमध्ये आरोग्य आणि लसीकरणाबाबत भीती आणि अज्ञान मोठ्या प्रमाणात होतं. लसीकरणाच्या गाड्या गावात आल्या की अनेक घरांची दारं बंद व्हायची. महिलांना आणि मुलांना अक्षरशः लपवून ठेवलं जायचं. अशावेळी मी घराघरात जाऊन महिलांना समजवायची. कधी झोपलेल्या मुलांना उचलून लसीकरणासाठी आणायची. घरात असणाऱ्या मोठ्या कोठींमध्ये महिला लपून राहायच्या. त्यांना कोठीतून बाहेर काढून त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करावा लागायचा", अशी त्यावेळची परिस्थिती गुंफा नेरकर यांनी सांगितली.

"अंगणवाडीत मुलं येत नसल्यानं त्या मुलांसाठी त्यांच्या घरी सुकडी नेऊन त्यांना खायला दिली जायची. गावात त्यावेळी चहासाठी काहीच नसल्यामुळं सुकडीतील गुळ काढून मी चहा बनवायची", असंदेखील गुंफा नेरकर म्हणाल्या. आज गावातली अनेक मुलं माझ्या हाताखाली वाढली. या अंगणवाडीतच ती शिकली. अशा अनेक मुलांची नातवंडसुद्धा आता अंगणवाडीत येतात. हे पाहून समाधान वाटत आहे", असे गुंफा नेरकर म्हणाल्या.

वैयक्तिक दुःख, पण गावाशी नाळ कायम- गुंफाबाई नेरकर यांच्या आयुष्यात वैयक्तिक दुःख वाट्याला आलं. त्यांच्या पतीचा कर्करोगानं मृत्यू झाला. तर मुलगाही यकृताच्या आजारामुळं निधन पावला. या कठीण प्रसंगानंतरही त्यांनी गाव सोडलं नाही. अमरावतीत नातेवाईक असले तरी त्यांचं मन मेळघाटच्या जंगलात आणि गावकऱ्यांमध्येच रमलेलं आहे. धारणी तालुक्यातील बैरागड परिसरात पतीनं घेतलेलं छोटसं शेत त्यांनी बटईनं दिलं आहे. त्यातून मिळणारा पैसा त्यांच्या जगण्याचा आधार आहे.

गावकऱ्यांच्या प्रेमानं उभं राहिलेले नातं- गावातील लोक त्यांना काकू, मावशी किंवा जुनी बाई म्हणून हाक मारतात. सणासुदीला कोणी ना कोणी त्यांच्या घरी जेवणाचा डबा पाठवतो. आजारी पडल्या तर गावातील युवक त्यांच्या दुचाकीवर बसवून चूर्णी येथे उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी त्यांना घेऊन जातात. गावात कोणाच्याही घरी कार्यक्रम असला की भाजी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. माझ्या हातची भाजी गावकऱ्यांना विशेष आवडते, असं गुंफाबाई आनंदानं सांगतात.

जन्मभूमी अमरावती, मात्र कर्मभूमी जारीदा - "माझे नातेवाईक अमरावतीला आहेत. पण, माझं आयुष्य जारीदा गावात गेलं आहे. जारीदा हेच माझं घर आहे. अखेरच्या श्वासापर्यंत मी हे गाव सोडणार नाही", असं गुंफाबाई म्हणतात. जन्मभूमी अमरावती असली तरी कर्मभूमी म्हणून मेळघाटातील जारीदा गावालाच मी पूर्णतः स्वीकारलंय, असंदेखील गुंफाबाई म्हणतात.

# महिला-केंद्रित थरारक क्राईम सिरीज – बेगम ऑफ क्राईम

(समर्थ गांवकरी)




भारतातील प्रमुख डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपली नवीन ओरिजिनल सिरीज, बेगम ऑफ क्राइम, xx मार्च 2026 रोजी लॉंच केली. ही सिरीज महत्वाकांक्षा, जगण्यासाठीची लढाई आणि सामर्थ्य मिळवण्याच्या किंमतीची थरारक कथा सादर करते, ज्यामुळे क्राईम थ्रिलर अधिक रोमांचक बनते. बेगम ऑफ क्राइम मध्ये महत्वाकांक्षा, सन्मान मिळवण्याची तीव्र इच्छा आणि स्त्री सशक्तीकरण व नाश यांचा संघर्ष दाखवला आहे. ही कथा दिव्या बद्दल आहे, जिची भूमिका सना मकबूलने साकारली आहे, आणि जी पारंपरिक नायिकेच्या कल्पनेला मोडते. धाडसी आणि ठाम असलेली दिव्या, स्वतःच्या जीवनासाठी घराचा सुरक्षित आधार सोडते आणि स्वतःच्या अटींवर आपले जीवन उभारण्याचा निर्धार करते. ज्या जगाने तिला कमी लेखले, त्या जगातही ती स्वतःला लहान पडू देत नाही. प्रत्येक अडथळा दिव्याचा निर्धार अधिक मजबूत करतो. प्रत्येक समर्पण तिला नैतिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत घेऊन जाते. सुरुवातीला ही गोष्ट फक्त जगण्यासाठीची लढाई होती, पण हळूहळू ती खूप धोकादायक बनते. फसवणूक सामान्य होते, छळ आणि मानसिक खेळ तिचे संरक्षण बनतात. चोरी आणि विश्वासघात पायऱ्या ठरतात, आणि शेवटी रक्त ओघळते. कमी समजल्या जाणाऱ्या स्वप्नाळू दिव्याचा बदल, विचारपूर्वक ताकदवान व्यक्ती बनणे, ही या थरारक कथेला मुख्य आधार देते.

दिव्याची भूमिका साकारण्याबद्दल तिचे विचार मांडताना सना मकबूल म्हणाली, "माझ्या ओटीटी पदार्पणासाठी मी योग्य प्रोजेक्टची वाट पाहत होते, आणि बेगम ऑफ क्राईम माझ्यासाठी परिपूर्ण ठरली. दिव्या धाडसी, निःसंकोच आणि अत्यंत ठाम आहे.

ती राखाडी नैतिकतेत काम करते; तिच्या प्रत्येक निर्णयाशी सगळे सहमत नसतील असे नाही. एक अभिनेत्री म्हणून तिच्या विचारात पाऊल ठेवणे भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक होते, कारण ती विश्वास ठेवते की जर जग तिला सन्मान देत नसेल, तर ती तो सन्मान कोणत्याही मार्गाने मिळवेल.

# छत्रपती शिवाजीनगर चौक नेवासा येथे श्री किसनगिरी बाबा तरुण मित्र मंडळाच्यावतीने भव्य शिवजयंती उत्सव साजरा

**नेवासा तालुका :** (समर्थ गांवकरी)



नेवासा तालुका येथील श्री किसनगिरी बाबा तरुण मित्र मंडळ छत्रपती शिवाजीनगर चौक येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन व आरती करण्यात आली यावेळी शिवकन्या संचित गणेश देवढे ईणे शिवगर्जना देऊन जयघोष केला यावेळी, पंचगंगा उद्योग समूहाचे सर्वसर्वे उद्योजक प्रभाकरराव शिंदे, नेवासा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महेश पाटील साहेब,नगराध्यक्ष डॉ करणं घुले ,उपनगराध्यक्ष संजय सुखधान, अण्णा भाऊ लष्करे प्रतिष्ठान चे बीट्टू भाऊ लष्करे ,धनू भाऊ काळे, नितीन भाऊ जगताप, नगरसेवक- महेश लोखंडे, निरंजन डाहळे ,सरोदे, संदीप सरकळे, कृष्णा परदेशी, अंकुश म्हस्के, पत्रकार राजू भाऊ वाघमारे ,डॉ काळे,पप्पू परदेशी, नाना शेंडे, प्रताप चिंधे, नितीन मिरपगार, बंडू शिंदे, प्रशांत बहिरट,

मंडळचे अध्यक्ष महेशअण्णा देवढे, मारूती गायकवाड, प्रशांत डाके, सचिन भांड, दत्ता गायकवाड, गणेश देवढे, विलास वीर,सुनील मैदाड,बंटी साळुंके,हर्षल कडू सचिन सावंत, तुषार कडू,युवराज आसने,ओम चव्हाण, गणेश पतंगे, दिनेश देवढे, अमोल राणमले,ओम गायकवाड, ऋषिकेश शाहने, यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त शिवप्रेमी उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागाचे 98 कोटी पुन्हा वळवले




**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

महायुतीला राज्यात पुन्हा सत्तेवर आणण्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची भूमिका निर्णायक ठरली होती. आता या योजनेच्या जानेवारी 2026 च्या हप्त्याकडे राज्यभरातील लाखो महिलांचे लक्ष लागलं आहे. दरमहा मिळणाऱ्या ₹1500 च्या अनुदानाचा जानेवारी महिन्याचा हप्ता येत्या काही दिवसांत खात्यात जमा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महिला व बालविकास विभागानं हप्तावाटपासाठी निधीची हालचाल सुरू केली असून, सामाजिक न्याय विभागाकडून 98.45 कोटींचा निधी वर्ग करण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यापूर्वीही या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाने निधी वर्ग केला होता. यापूर्वीही सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवण्यात आला होता. लाडकी बहीण ही योजना जरी लोकप्रिय ठरली असली तरी सरकारला त्याच्या निधीसाठी पैशांची प्रचंड जुळवाजुळव करावी लागत असल्याचं याआधी स्पष्ट झालं आहे. आदिवासी विकास आणि सामाजिक न्याय विभागाचा निधी महिला आणि बालविकास विभागाकडे सातत्याने वळवण्यात येत असल्याचं दिसून येतं.

लाडकी बहीण योजना जुलै 2024 मध्ये योजना सुरू झाली तेव्हा लाभार्थींची संख्या 2 कोटी 46 लाख होती. त्यापैकी केवळ 1 कोटी 90 लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली. म्हणजेच सुमारे 55 लाख महिलांनी ई-केवायसी न केल्यानं त्या वितरणातून वगळल्या गेल्या. डिसेंबर महिन्याचा हप्ता 1 कोटी 60 लाख महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

नोव्हेंबर 2025 चा हप्ता डिसेंबरअखेर आणि जानेवारी 2026 च्या सुरुवातीला वितरित करण्यात आला होता, तर डिसेंबर महिन्याची रक्कम 14 जानेवारीदरम्यान लाभार्थींच्या खात्यात जमा झाली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा ₹1500 दिले जातात. मात्र 'पीएम किसान सन्मान निधी' आणि 'नमो शेतकरी महासन्मान निधी'चा लाभ घेणाऱ्या महिलांना 'लाडकी बहीण' योजनेतून दरमहा ₹500 इतकीच रक्कम मिळते. दरम्यान, लाभार्थींच्या संख्येत घट झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. ई-केवायसी दुरुस्तीसाठी 31 मार्च 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, पात्र महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. योजनेचे सातत्य राखताना लाभार्थ्यांची पडताळणी आणि निधी व्यवस्थापन हा सरकारपुढील महत्त्वाचा ताळमेळाचा प्रश्न ठरत आहे. 2025–26 च्या अर्थसंकल्पात 'लाडकी बहीण' योजनेसाठी आधीच 36,000 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एकूण 7.20 लाख कोटींच्या अर्थसंकल्पाच्या सुमारे 5 टक्के इतकी ही रक्कम आहे. त्यातच आता इतर विभागांच्या निधीतून अतिरिक्त निधी वळवला जात आहे. याआधी राज्य सरकारकडून सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागांच्या निधीतून तब्बल 746 कोटींची तरतूद 'लाडकी बहीण' योजनेकडे वळवण्यात आले होते. या निर्णयामुळे राज्याच्या अर्थकारणावर या योजनेचा वाढता ताण पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. सामाजिक न्याय विभागाच्या 3,960 कोटींच्या तरतुदीतून 410.30 कोटी, तर आदिवासी विकास विभागाच्या 3,240 कोटींपैकी 335.70 कोटी 'लाडकी बहीण' योजनेसाठी देण्यात आले. सरकारने या निधीचा उपयोग अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील लाभार्थी महिलांसाठीच केला जाईल, असा दावा केला जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

आताच्या निधी वळवण्यात आल्याच्या शासननिर्णयाबाबत सामाजिक न्याय मंत्री संजय शीरसाट यांनी ईटीव्ही भारतशी बोलताना म्हटले, "मागचे काही महिने सातत्याने सामाजिक न्याय विभागाच्या निधीतील रक्कम लाडकी बहीण योजनेसाठी दिली जात आहे. याआधीही मी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. पण त्यानंतरही सरकारची हीच भूमिका आहे. त्यावर मी काय बोलणार? असा प्रश्न शीरसाट यांनी उपस्थित केला आहे. या वादातून 'लाडकी बहीण' योजनेच्या सातत्याचा प्रश्न आणि राज्याच्या अर्थकारणावर वाढता भार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

निधी वळवण्यावरून मंत्र्याची नाराजी विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या या योजनेस सुरुवातीला 46,000 कोटींची तरतूद करण्यात आली होती. महायुतीच्या सत्तेतील पुनरागमनात या योजनेची भूमिका महत्त्वाची मानली जाते. मात्र त्यानंतर या योजनेचा आर्थिक बोजा आणि तिजोरीवरील ताण हेच राज्यातील राजकारणाचे प्रमुख मुद्दे ठरले आहेत. मागच्या अर्थसंकल्पात या योजनेची तरतूद ₹36,000 कोटींवर आणत सरकारने आर्थिक शिस्त राखल्याचा दावा केला होता. मात्र सतत निधी वळवणीमुळे त्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महायुतीतील काही मंत्र्यांनीही या योजनेमुळे इतर विभागांवर गंडांतर येत असल्याची तक्रार यापूर्वीच केली होती.

# महिला दिनानिमित्त महिलांसाठी सोन्याच्या नाण्याची खास ऑफर

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

महिला दिन साजरा करण्यासाठी आणि महिलांना स्वतःचे घर खरेदी करण्यासाठी प्रोत्साहित करत, कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी जवळ असलेल्या आपल्या प्रीमियम रेसिडेन्शियल प्रोजेक्ट कॅसाग्रँड कॅलेडियम मध्ये खास ऑफर जाहीर केली आहे. या ऑफरअंतर्गत, 8 आणि 9 मार्च 2026 रोजी घर बुक करणाऱ्या महिला ग्राहकांना महिला दिनाचे खास बक्षिस म्हणून 46 ग्रॅम सोन्याची नाणी भेट स्वरूपात मिळतील. ही ऑफर महिला दिनानिमित्त सादर करण्यात आली आहे तसेच त्या महिलांचा सन्मान करण्यासाठी आहे ज्या आर्थिक निर्णय स्वतःघेतात, जसे की रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करणे किंवा स्वतःचे घर खरेदी करणे. भारतात पारंपारिकरित्या सोन्याला नेहमी समृद्धी आणि सुरक्षिततेचे प्रतीक मानले जाते. या ऑफरद्वारे कॅसाग्रँड महिलांच्या घर आणि कुटुंब घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिकेचा सन्मान करत आहे. पुण्यातील वेगाने वाढणाऱ्या रेसिडेन्शियल भागांपैकी एक असलेल्या अप्पर खराडी जवळ, कॅसाग्रँड कॅलेडियमची घरे उत्तम ठिकाणी स्थित आहेत. ही घरे विचारपूर्वक डिझाइन केलेली आहेत आणि येथे आधुनिक सुविधा, उत्तम कनेक्टिविटी तसेच जवळच्या आयटी हब, शाळा आणि इतर लाइफस्टाइल ठिकाणे सर्व उपलब्ध आहेत. या महिला दिनाच्या उपक्रमाद्वारे, कॅसाग्रँड महिलांचा सन्मान करत त्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच पुण्यातील भविष्यासाठी तयार रेसिडेन्शियल कम्युनिटीमध्ये खरेदी करण्याची इच्छा असलेल्या ग्राहकांसाठी अधिक मूल्य देत आहे. हा प्रोजेक्ट महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेशन अॅक्ट अंतर्गत नोंदणीकृत आहे – RERA No.: P52100080302. ही ऑफर फक्त 8 आणि 9 मार्च 2026 रोजी केलेल्या घरांच्या बुकिंगसाठी वैध आहे आणि नियम व अटी लागू आहेत.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये १० मार्चपासून 'कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी' शिबीर

## लंडनचे प्रख्यात आंतरराष्ट्रीय हृदयविकार तज्ज्ञ डॉ. सुधीर राठोरे करणार प्रक्रिया मार्गदर्शन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटल व एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटतर्फे विशेष पुढाकार घेत येत्या ९ ते १५ मार्च २०२६ यादरम्यान 'मोफत हृदयरोग तपासणी व जटिल (कॉम्प्लेक्स) अँजिओप्लास्टी' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात लंडन येथे कार्यरत असलेले आंतराष्ट्रीय ख्यातीचे प्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. सुधीर राठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जटील अँजिओप्लास्टीसाठी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व वरिष्ठ हृदयविकार



तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी दिली.

ते म्हणाले की, हे शिबिर १० मार्च ते १५ मार्च पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिरात रुगंना सुरु राहणार आहे. डॉ. राठोरे हे १३ व १४ मार्च रोजी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहून रुग्णांची 'जटिल अँजिओप्लास्टी' करण्यासाठी मार्गदर्शन करतील. डॉ. राठोरे हे लंडन येथील एनएचएस हॉस्पिटल येथे 'कन्सलटंट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट' म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना मिळणार असल्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा असेही आवाहन करण्यात आले आहे. या सात दिवसीय शिबिरामध्ये हृदयाच्या रक्तवाहिन्यांवरील अॅडव्हान्स कोरोनरी इंटरव्हेंशन (Advanced Coronary Intervention) उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यामध्ये क्रॉनिक टोटल ऑक्लूजन (CTO) अँजिओप्लास्टी, गुंतागुंतीची व जटिल अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन व बायफर्केशन अँजिओप्लास्टी, रोटेशनल अॅथरेक्टॉमी (Rotablation), आयव्हस (IVUS) व रोटा OCT यांसारख्या अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले जाणार आहेत. तसेच हृदयविकाराचा धक्का बसलेल्या रुग्णांसाठी तातडीची अँजिओप्लास्टी (Primary PCI) करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच छातीत दुखणे, जळजळ होणे, चालताना दम लागणे किंवा अचानक दरदरून घाम येणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ती हृदयविकाराची असू शकतात. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या शिबिरात मोफत आपली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी केले. विशेष म्हणजे, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या रुग्णांना या शिबिरात मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधा दिली जाणार असल्याचे बोरसे यांनी सांगितले. यासोबतच या शिबिराच्या अधिक माहितीसाठी हृदयविकार विभागाच्या 7744913913 या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये अद्ययावत असलेली साधन सामुग्री आणि सुसज्ज क्रिटीकल केअर विभाग यामुळे मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी होत असलेल्या क्लिष्ट शस्त्रक्रिया, प्रक्रिया एसएमबीटीत करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारच्या कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी करण्यासाठी वेगळ्या प्रकारचे कौशल्य अवगत असणे गरजेचे असते.

हे कौशल्य येथील तज्ञांकडे असल्यामुळे गेल्या काही वर्षांत याठिकाणी फादर ऑफ कार्डीओलॉजीस्ट डॉ सम्युअल मॅथ्युज, दिवंगत सीव्हीटीएस सर्जन डॉ. एस.एस. भट्टाचार्य, बाल हृदयविकार तज्ञ डॉ. गुयेन लॅन ह्यू, प्रसिद्ध तावी (TAVI) कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी तज्ञ डॉ यान कोवाक यांनीही याठिकाणी उपस्थित राहून हृदयविकार प्रक्रिया केल्या आहेत.

### हे शिबिर कोणासाठी उपयुक्त?

ज्या रुग्णांना हृदयाच्या रक्तवाहिन्यांतील ब्लॉकेजमुळे बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला आहे, परंतु बायपास करणे धोकादायक ठरू शकते किंवा ज्यांना बायपासची भीती वाटते, अशा रुग्णांसाठी हे शिबिर विशेष उपयुक्त आहे. कॅल्शियम साचल्यामुळे कडक झालेल्या रक्तवाहिन्या, रोटा, आयव्हस (IVUS) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अँजिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिलेले रुग्ण तसेच ज्या रुग्णांच्या धमनीतील ब्लॉकेज कठीण किंवा गुंतागुंतीच्या ठिकाणी आहे आणि ज्यासाठी तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची आवश्यकता असते, अशा रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

हृदयविकाराच्या उपचारांमध्ये तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. अनेकदा रक्तवाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कॅल्शियम साचलेले असते किंवा त्या पूर्णपणे बंद झालेल्या असतात. अशा जटिल केसेसमध्ये सामान्य अँजिओप्लास्टी यशस्वी होत नाही, तिथे अद्ययावत तंत्रज्ञानाची गरज असते. एसएमबीटीमध्ये आम्ही जागतिक दर्जाची ही सेवा ग्रामीण आणि गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवत आहोत. डॉ. सुधीर राठोरे यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या अनुभवामुळे आणि कौशल्यामुळे आपल्या भागातील रुग्णांना लंडनसारख्या शहरात मिळणारे उपचार मार्गदर्शन एसएमबीटीत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

**- डॉ. गौरव वर्मा, संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ**

# श्रीगोंदा तहसील कार्यालयावर जाहीर मोर्चा

■ शेतकरी व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

शेतकरी व नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीगोंदा तहसील कार्यालयावर जाहीर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अॅड. संभाजीराव (आप्पा) यांनी केले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सध्या बाजारभाव मिळत नसल्याने त्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रति क्विंटल १५०० ते २००० रुपये कांदा अनुदान देण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय अन्नपदार्थांमधील भेसळ, विशेषतः दूध भेसळ प्रकरणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप



करत यावर कठोर कारवाई करण्याची मागणीही या मोर्चाद्वारे केली जाणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात यापूर्वी गाजलेल्या दूध भेसळ प्रकरणात दोषींवर ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच भारतीय संविधानाची प्रभावी अंमलबजावणी करून लोकशाही बळकट करणे, सर्व धर्मीयांमध्ये सद्भावना निर्माण करणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योग्य प्रशासन आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. श्रीगोंदा तालुक्यातील रस्त्यांची दयनीय अवस्था, मंजूर विकासकामांची संथ गती व निकृष्ट दर्जा, तसेच श्रीगोंदा शहरातील सरकारी कार्यालय परिसरातील अस्वच्छता याबाबतही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. श्रीगोंदा तहसील कार्यालय परिसरात महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय, मुतारी आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या गैरप्रकार व भ्रष्टाचाराबाबत तक्रारी करूनही योग्य चौकशी व कारवाई होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या व इतर ज्वलंत प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व निवेदन देण्यासाठी शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अॅड. संभाजीराव (आप्पा) यांनी केले आहे

# हातगाडे वाल्यांची दादागिरी

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

दिनांक 6मार्च रोजी वादग्रस्त बुद्ध विहार च्या जागेवर हातगाड्या वाल्यांचा अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका गाड्या वाल्यांना पोलिसांनी समज देऊन हाकलून दिल्याने संबंधित हातगाडेवाला मुख्य चौकात एका मेडिकल समोर गाडा लावण्याचा प्रयत्न करण्याच्या विरोध करणाऱ्या मेडिकल वाल्यांना दुकानात घुसून हातात दगड घेऊन मारहाण करण्याचा प्रयत्न केला.ही घटना पोलिसांनी प्रत्यक्षात डोळ्यांनी पाहून ही काही मध्यस्थी न केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. ही सर्व घटना सीसीटीव्ही फुटेज नजर केद असून पोलीस म्हणतो काहीच झालं नाही. जर झालं असेल तर तुम्ही तक्रार द्या मी तक्रार घेतो.. तामसा पोलिसाचा असा बेजबाबदारपणा समोर आल्याने पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहे.

# विकसित भारताच्या संकल्पनेत महाविद्यालयांचे योगदान मोलाचे

■ श्रीगोंद्यात राष्ट्रीय परिषदेचे दिमाखदार उद्घाटन

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

'२०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करताना महाविद्यालयीन तरुणाईची भूमिका आणि नैतिक मूल्यांची जपणूक अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे,' असे प्रतिपादन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले.

श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दि. ६ व ७ मार्च २०२६ रोजी आयोजित "विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान" या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. उद्घाटनपर मनोगत



व्यक्त करताना डॉ. म्हस्के यांनी बदलत्या शैक्षणिक प्रवासावर प्रकाश टाकला. पूर्वीच्या आणि आजच्या विद्यार्थ्यांमधील तफावत स्पष्ट करताना ते म्हणाले की, केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे; तर शिक्षणासोबत जबाबदारीची जाणीव आणि मानवी मूल्यांची जोपासना आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात भारत एक महासत्ता म्हणून उभा राहील, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा नागवडे यांनी अध्यक्षीय मनोगतातून उपस्थितांना मोलाचा संदेश दिला. "देश भौतिक प्रगती करत असताना आपण माणूस म्हणून हरवता कामा नये. विकसित भारताच्या वाटचालीत माणुसकीची जपणूक करणे ही काळाची गरज आहे," असे त्यांनी नमूद केले. परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करणे आवश्यक असून अशा प्रकारच्या राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, भारत हा तरुणांचा देश असून महाविद्यालये ही या तरुण शक्तीला आकार देणारी कौशल्य केंद्रे आहेत. केवळ पदवीधरांची संख्या वाढवणे हे उद्दिष्ट नसून जबाबदार आणि प्रगल्भ नागरिक घडवणे हे आमचे कर्तव्य आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि संशोधक आपले विचार मांडणार असून या वैचारिक मंथनातून देशाच्या विकासासाठी मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'विकसित भारत २०४७' मध्ये महाविद्यालये ठरतील राष्ट्र परिवर्तनाचे केंद्रबिंदू

■ श्रीगोंद्यात राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'विकसित भारत २०४७ मध्ये महाविद्यालयांचे योगदान' या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद मोठ्या उत्साहात पार पडली. ६ व ७ मार्च २०२६ रोजी झालेल्या या परिषदेने शिक्षण क्षेत्रातील भविष्यातील दिशा, तरुण शक्तीची भूमिका आणि राष्ट्रनिर्मितीत महाविद्यालयांचे योगदान यावर व्यापक चर्चा घडवून आणली. परिषदेचे उद्घाटन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी बदलत्या शैक्षणिक प्रवासावर प्रकाश टाकत केवळ



पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर पदवीसोबत जबाबदारीचे भान आणि मानवी मूल्यांची जपणूकही तितकीच आवश्यक असल्याचे सांगितले. स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात भारत जागतिक महासत्ता म्हणून उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा नागवडे यांनी भौतिक प्रगतीसोबत माणुसकी टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. परिवर्तनाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून करावी, असे आवाहन करत महाविद्यालय अशा राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्रांमधून प्रगतीची नवी शिखरे सर करत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी महाविद्यालयांना 'कौशल्य केंद्रे' म्हणून संबोधत येथे उद्याची तरुण शक्ती घडवली जात असल्याचे नमूद केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य प्रा. संदीप पालवे यांनी महाविद्यालये ही केवळ ज्ञानाची मंदिरे नसून राष्ट्र परिवर्तनाचे केंद्रबिंदू असल्याचे सांगितले.

दुपारच्या सत्रात प्राचार्य डॉ. गोविंद राजेनिंबाळकर यांनी समाजपरिवर्तनाचे सूत्र मांडताना प्रशासनावर टीका करण्यापेक्षा बदलाची सुरुवात स्वतःच्या घरापासून करण्याचे आवाहन केले. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी कोलकाता येथील एस.के.बी. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. दीपक मंडल यांनी जुन्या व नव्या शिक्षण व्यवस्थेची तुलना करत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. "एखाद्या देशाचा विध्वंस करण्यासाठी क्षेपणास्त्रांची गरज नसते; त्या देशाची शिक्षण व्यवस्था कोलमडणे पुरेसे असते," या त्यांच्या विधानाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले. तसेच लडाख विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. मोहम्मद शहनवाज यांनी २०४७ पर्यंत प्लास्टिक प्रदूषणमुक्त भारत घडवण्यासाठी विविध उपाय सुचवले.

# परीक्षेत घवघवीत यश; विद्यार्थी पात्र

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

लोहा तालुक्यातील अष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलने नुकत्याच झालेल्या एन.एम.एम.एस. (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेत शाळेतील तब्बल आठ विद्यार्थी पात्र ठरले असून शाळेच्या गुणवत्तेचा लौकिक अधिक उंचावला आहे. आर्थिक दृष्ट्या मागास कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता आठवीत ही एन.एम.एम.एस. परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते. अष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलने गेल्या काही वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत एकच ध्यास गुणवत्तेचा विकास हा उपक्रम राबवला असून त्याचे फलित या यशातून दिसून आले आहे.

# शहरातील सर्व दुकानदाराना सूचना

■ कचरा कुठेही टाकू नका
■ दुकानासमोर डसबीन ठेवा
■ रस्त्यावर टाकल्यास कार्यवाही - नगराध्यक्ष व टीम

**लोहा : (समर्थ गांवकरी)**

लोहा शहरात सत्तांतर झाल्या नंतर स्वच्छतेला व दुकानासमोर बॅनर निर्बंधतेला प्राधान्य देण्यात आले आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याला प्राधान्य द्यावे हीच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा याना श्रद्धांजली ठरणार आहे असा सूचना दिल्यानंतर शहरातील सर्व दुकाने छोटे स्टॉल , हातगाडे ,भाजीपाला विक्रेते सर्वांना नगर पालिकेने लेखी सूचना दिल्या असून रस्त्यावर कचरा टाकू नका स्वतःच्या दुकानात डस्टबिन ठेवा घंटागाडी ,ट्रॅक्टर येईल व कचरा नेतील घाण केल्यास कार्यवाही होईल असा सूचना नगर पालिका प्रशासनाने लेखी दिल्या तर स्वतः नगराध्यक्ष शरद पवार व टीम रात्री बाजारपेठेत फिरून पाहणी करत आहेंत लोहा शहर 'बदलते "आहे .सत्तांतर झाले आणि नागरिकांना स्वच्छता दिसायला लागली आ प्रतापराव पाटील यांनी दुकानाच्या समोर बॅनर लावु नका



असे निर्देश दिल्या नंतर त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू आहे शिवजयंती काळात "शुभेच्छा बॅनर ऐवजी पुस्तके द्या", या नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अहवानाला मोठा प्रतिसाद मिळाला . शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे आपण निर्माण केलेले कचरा सुका कचरा नगरपरिषदेच्या घंटागाडीत व टैक्ट्रर मध्ये टाकावे. इतरत्र कोठेही टाकू नये. इतरत्रा हा टाकल्यास घनकचरा हाताळणी नियम 2016 अंतर्गत व महाराष्ट्र नगरपरिषद / नगरपंचायती नगरी अधिनियम 1965 चे कलम 229 अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद असा नोटीस मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिल्या आहेत.स्वछता प्रमुख जितेंद्र ठावरे स्वच्छता निरीक्षक लता ढवळे व सहकारी कर्मचारी पहाटेच शहरात स्वच्छता कामावर देखरेख करत आहेत उपनगराध्यक्ष करिम शेख माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम,छत्रपती धुतमल हरिभाऊ चव्हाण, भास्कर पवार, व सर्व नगरसेवक स्वच्छ शहरासाठी आग्रही आहेत शहरात रात्री दुभाजक व दुकानासमोर कचरा टाकत होते पण नगराध्यक्ष शरद पवार व टीमने यावर प्रतिबंध घातला असून असे निदर्शनास आले तर स्वतः नगराध्यक्ष त्या दुकानदार ,हातगाडे वाल्याना सांगताहेत त्यामुळे कचऱ्याचे ढीग व रस्त्यावर टाकण्यावर आळा बसला असून शहरातील मुख्य बाजारपेठ स्वच्छ दिसते आहे.

# वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ चे आयोजन

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे दिनांक १० मार्च २०२६ ते १२ मार्च २०२६ या कालावधीत वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा, स्पर्धेच्या युगात आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित व्हावी तसेच बौद्धिक व शारीरिक विकास साधावा या उद्देशाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धांमध्ये धावणे, दोरीउड्या, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक व रस्सीखेच अशा स्पर्धांचा समावेश आहे. तसेच सांस्कृतिक विभागाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन, कथाकथन, वादविवाद, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, पीपीटी सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन, गीतगायन, मेहंदी स्पर्धा, प्रश्नमंजुषा, अंताक्षरी, रांगोळी तसेच रील्स बनविण्याची स्पर्धा यांसारख्या विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा दिनांक १० मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला असून प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी साहित्यिक डॉ. मनोज बोरगावकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन नरेंद्र दादा चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. एच. मेहत्रे, क्रीडा विभाग समन्वयक डॉ. अर्जुनसिंग ठाकूर तसेच राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. प्रकाश कोथळे यांनी केले आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद ठाणे येथे महिला सन्मान सोहळा

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका व गुणवंत मुलींचा गौरव

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा सेविका तसेच विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या मुलींचा सन्मान सोहळा दि. ०६ मार्च, २०२६ रोजी बी. जे. हायस्कूल येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते रोख पुरस्कार, प्रशस्तीपत्रक व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव (भा.प्र.से.) यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात




आला. ग्रामीण भागात महिला व बालकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि आशा सेविका यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

"ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका व पर्यवेक्षिका या महिला व बालकल्याणाच्या कार्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत. अशा कर्तव्यनिष्ठ महिलांचा सन्मान करणे ही जिल्हा परिषद ठाणेची कृतज्ञतेची भावना आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या कार्याला अधिक बळ देण्यासाठी जिल्हा परिषद ठाणे सदैव कटिबद्ध आहे." - मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या उज्ज्वला गलादे-पाटील यांनी उपस्थित महिलांना महिलांचे आरोग्य, पोषण, स्वच्छता आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतःच्या आरोग्याबाबत सजग राहून कुटुंब व समाजाच्या आरोग्यदायी भविष्यासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी सांगितले की, "अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका आणि पर्यवेक्षिका या ग्रामीण भागातील महिला व बालकल्याणाच्या कार्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. त्यांच्या अथक परिश्रमामुळे शासनाच्या विविध योजना तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतात. अशा कर्तव्यदक्ष महिलांचा सन्मान करणे म्हणजे त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देणे असून यामुळे इतर महिलांनाही समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळते." या कार्यक्रमास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे, जिल्ह्यातील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, तसेच जिल्हा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित या सन्मान सोहळ्यामुळे जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# कुंटूर येथे महाराजस्व अभियान शिबिर यशस्वी संपन्न

- महिला पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती
- नागरिकांना महसूल प्रमाणपत्र वेळेमध्ये द्या क्रांती डोंबे उपविभागीय अधिकारी यांचे मत



**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील कुंटूर जिल्हा परिषद सर्कल कुंतुर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर योजनेचे आयोजन करण्यात आले होते. या योजनेचे उद्घाटन क्रांती डोंबे उपविभागीय अधिकारी बिलोली यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डी अनन्या रेड्डी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा तहसीलदार नायगाव हे उपस्थित यांच्या उपस्थित सदर शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरामध्ये एकाच छताखाली कृषी विभाग आरोग्य विभाग महसूल विभाग ही पंचायत राज ग्रामपंचायत विभाग ,msrlm विभाग अशा विविध सर्व प्रमाणपत्र नागरिकांना एकाच वेळी उपलब्ध करून देण्यात आले . यावेळी अभियान महाराज शिवा अभियानामध्ये निकालने करण्यात आलेले प्रमाणपत्राचे संख्या पुढीलप्रमाणे आहे फेरफार निकाली-31, सातबारा दुरुस्ती -13 ,सातबारा डिजिटल -, 8अ उतारा 187, शिधापत्रिका -20, आयुष्यमान भारत कार्ड 113 ,सिकलसेल ची तपासणी - 110 ,गरोदर माता तपासणी -150 अभियान वितरित प्रमाणपत्र ची संख्या- 243 भूसंपादन-5, अ कृषीक परवानगी-6, असे इतर मिळून प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी ,जातीच्या प्रमाणपत्र ,नॉन क्रिमिनल डिजिटल सातबारा, फेरफार, प्रलंबित फेरफार नवीन व्यवस्थापनुसार सनद प्रक्रिया, सामाजिक अर्थसहा योजनेच्या लाभ मंजूर करणे व विद्यार्थ्यांना दाखले देणे तसेच राष्ट्रीय श्रावण बाळ योजना इंदिरा गांधी योजना व संजय गांधी योजना अशा विविध योजना नागरिकांना महिलांना पुरुषांना एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्राचे पूर्तता करण्यात आली . सदर कार्यक्रम सकाळी 10- वाजून 40 मिनिटांनी सुरुवात करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद हायस्कूल कुंटूर येथील सभागृहामध्ये सदर कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी गावातील नागरिक परिसरातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर महाराजस्व अभियानाच्या यशस्वीतेसाठी महसूल विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी तलाठी मंडळ अधिकारी कोतवाल सर्व अधिकाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली त्या मेहनतीने परिसरातील नागरिकांची कामे वेळेवर करून देण्यात आले. शेतीचा सातबारा असो व पांदन रस्ता प्रलंबित कोणतेही कामे ठेवू नका अशी माहिती यावेळी क्रांती डोंबे यांनी आपल्या महसुली भागातील सर्व कर्मचाऱ्यांना दिले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायगाव तहसीलदार अनन्या रेड्डी हे उपस्थित होते. यावेळी गावातील नागरिक व महिला शासकीय कर्मचारी कुंटूर मंडळ अधिकारी आर के पवार ,कुंटूर तलाठी बालाजी मुधळे, राहेर तलाठी बाबुराव डाकेवाड , सालेगाव तलाठी पवन कदम व परिसरातील मंडळ अधिकारी बरबडा मांजरम नरसी नायगाव येथील सर्व मंडळातील कर्मचारी उपस्थित होते . तसेच महिला बचत गट उद्योग व्यवसाय करणारे स्टॉल हे लावण्यात आले. यामध्ये msrlm विभाग नायगावचे बीएम प्रशांत मोरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या महिला बचत गटाची घोंगडी व आवळा कॅन्डी अशा दोन गटांना भेट दिली.

यात कुंटूर येथील राजस्व महाभियानामध्ये गावातील नागरिकांना गावांमध्येच राशन कार्ड विभाग आरोग्य विभागातील आरोग्य कार्ड आयुष्यमान भारत कार्ड लाडकी बहिणी केवायसी आधार अपडेशन गावातील ग्रामपंचायत अंतर्गत जन्म मृत्यू प्रमाणपत्र रहिवासी प्रमाणपत्र अशा विविध दाखले यावेळी वितरित करण्यात आले.

# तुप्पा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद


**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील पहिले शिबिर तुप्पा येथे उत्साहात पार पडले. विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले. तहसील कार्यालय, नांदेड यांच्यावतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ७४२ ऑनलाईन सातबारा उतारे व ५१२ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच ४५ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले. शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या. या कार्यक्रमास आ आनंद बोंढारकर तसेच उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी मार्गदर्शन केले. तहसीलदार संजय वारकड यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. नायब तहसीलदार माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले.

# आमदार पवार यांनी उद्घाटन केल्याले काम दोन वर्षांपासून खडी टाकलेल्या अवस्थेतच

**कळवण : (समर्थ गांवकरी)**



कळवण तालुक्यातील ओतूर ते कुंडाणे ओ चौऱंगीनाथ दरम्यानचा महत्त्वाचा रस्ता गेल्या तब्बल दोन वर्षांपासून खडी टाकून अधवट अवस्थेतच पडून असल्याने नागरिकांचा संताप दिवसेंदिवस वाढत आहे. या अपूर्ण रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अनेक लहान-मोठे अपघात देखील घडले आहेत. तरीही संबंधित विभागाकडून याकडे गंभीरपणे लक्ष दिले जात नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे, सैल खडी आणि धुळीचे साम्राज्य असल्याने दुचाकीस्वारांना संतुलन राखणे कठीण होत आहे. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट होते. दररोज शाळेत जाणाऱ्या शाळकरी मुलांना, रुग्णांना आणि वयोवृद्ध नागरिकांना या रस्त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा दुचाकी घसरून अपघात झाल्याच्या घटना देखील घडल्या असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे काम सुरू झाले तेव्हा परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र काम सुरू झाल्यानंतर काही काळातच ते थांबले आणि आजही रस्ता अपूर्णच राहिला आहे. परिणामी नागरिकांना धुळीचा त्रास, अपघातांचा धोका आणि वाहनांच्या दुरुस्तीचा आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीबाबत कुंडाणे येथील उपसरपंचांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, तात्काळ रस्त्याचे काम सुरू करण्यात आले नाही तर उपविभागीय सार्वजनिक आदिवासी बांधकाम विभाग, कळवण येथे तीव्र आंदोलन व उपोषण करण्यात येईल. तसेच अपूर्ण रस्त्यामुळे ज्या नागरिकांच्या वाहनांचे नुकसान झाले आहे, त्या सर्वांचे नुकसान भरपाई संबंधित विभाग व कंत्राटदाराकडून वसूल करून घेण्यात येईल. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी रस्ता ही केवळ सुविधा नसून जीवनरेखा आहे. परंतु प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही जीवनरेखा आज जीवघेणी बनली आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन ओतूर–कुंडाणे ओ चौऱंगीनाथ रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करावे, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# बाबुराव पाटील यांची निवड

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील पात्र कलाकारांची निवड करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत भोकर येथील 'सकाळ'चे बातमीदार व साहित्यिक बाबुराव पाटील यांचा समावेश करण्यात आला आहे. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या शिफारशीवरून आणि नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली असल्याचे कळते. शासन निर्णयानुसार याबाबतची आवश्यक प्रशासकीय कार्यवाहीही पूर्ण करण्यात आली आहे.

# जागतिक महिला दिनानिमित्त नांदेड भारत स्काऊट गाईडच्या गाईड विद्यार्थिनींनी घेतली मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नांदेड मेघना कावली (भा.प्र.से.)यांची उत्स्फूर्त मुलाखत.

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**




दि ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नांदेड भारत स्काऊट गाईड कार्यालयाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नांदेड च्या मेघना कावली (भा. प्र. से.)यांची जि. प.प्राथमिक शाळा शेणी ता. अर्धापूर व लालबहादूर शास्त्री विद्यालय नांदेड येथील गाईड विद्यार्थिनींच्या माध्यमातून जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत मुलाखतीचा उपक्रम राबविला . जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने गाईड विद्यार्थ्यांनी विविध विषयावर प्रश्न विचारून एका आयएएस महिला अधिकाऱ्यांशी होणाऱ्या भेटीचा आनंद व्यक्त केला. गाईड्स विद्यार्थिनींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना मेघना कावली यांनी उस्फूर्तपणे दाद देत विद्यार्थिनींच्या वयाला अनुरूप व समजेल अश्या सोप्या भाषेत अतिशय मनमोकळेपणाने उत्तरे देत आपल्या बालवयापासून स्वयंशिस्त व सकारात्मक विचार अंगीकृत केले तर यश नक्कीच गाठता येते असे सखोल मार्गदर्शन केले. यावेळी मुलाखत उपक्रमामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेनी, ता. अर्धापूर आणि लाल बहादूर शास्त्री प्रा.विद्यालय नांदेड येथील गाईड्स विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी गाईड विद्यार्थिनींना हा अनुभव एक प्रेरणादायी व आनंददायी ठरला.या मुलाखत उपक्रमाचे आयोजन शिक्षणाधिकारी (प्रा.) तथा जिल्हा मुख्य आयुक्त नांदेड भारत स्काऊट गाईड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी महिला दिनाच्या शुभेच्छा देत जिल्हा प्रशिक्षण आयुक्त श्रीमती.भगीरथी बच्चेवार व गाईड कॅप्टन शेणी श्रीमती.प्रणिता देशमुख यांनी स्वागत केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा संघटक श्रीमती माधुरी जवणे यांनी तर आभार श्रीमती. उषा नळगिरे यांनी मानले . यावेळी मुलाखती करिता गाईड कॅप्टन श्रीमती प्रणिता देशमुख , श्रीमती सुनंदा बेंद्रीकर,श्रीमती शोभा निलेवार ,श्री .पांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली मॅडम यांचे सोबत बिस्कीट ,ज्यूस चा आनंद घेत गाईड विद्यार्थिनींना भेट वस्तूही दिल्यात.

तसेच आयुष्यात शिस्त अत्यंत महत्त्वाची असून अन्न कधीही वाया घालवू नये आणि सातत्याने अभ्यास करावा, असा प्रेरणादायी आणि प्रशासनात सेवा करण्याची संधी मेहनतीच्या माध्यमातून गाठता येईल असा मोलाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# अर्धापूर नगरपंचायतीकडून थकीत कर वसुलीसाठी धडक मोहीम

## थकबाकीदारांचे नळ कनेक्शन सील; करण्याचा इशारा

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



शहरातील नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी नगरपंचायतीकडून मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांविरोधात विशेष धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत थकीत कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांवर कठोर कारवाई सुरू करण्यात आली असून काही ठिकाणी नळ कनेक्शन सील करण्याची कारवाई करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी दिली आहे. नगरपंचायतीकडे मालमत्ता कर व पाणीपट्टीचे मोठ्या प्रमाणावर थकबाकी प्रलंबित असल्यामुळे महसूल विभागामार्फत विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांकडून शहरातील विविध भागांमध्ये जाऊन थकबाकीदारांना नोटिसा देणे, प्रत्यक्ष भेट देऊन कर भरण्यासाठी आवाहन करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

नगरपंचायत प्रशासनाने थकबाकीदारांना वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा न केल्यामुळे आता कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये थकबाकीदारांच्या मालमत्ता व नळ कनेक्शन सील करणे, आवश्यकतेनुसार मालमत्ता जप्तीची प्रक्रिया सुरू करणे तसेच इतर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. नगरपंचायतीकडून राबविण्यात येणाऱ्या या विशेष मोहिमेमुळे शहरातील कर वसुलीमध्ये वाढ होत असून काही दिवसांतच लाखो रुपयांची वसुली करण्यात प्रशासनाला यश आले आहे. या वसुलीतून मिळणारा निधी शहरातील रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता, सार्वजनिक प्रकाश व्यवस्था, उद्याने तसेच इतर नागरी सुविधा सुधारण्यासाठी वापरण्यात येणार आहे. दरम्यान, नागरिकांना कर भरण्यासाठी नगरपंचायत कार्यालयात तसेच ऑनलाइन माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने आपली थकबाकी भरून कारवाई टाळावी असे आवाहन नगरपंचायत प्रशासनाने केले आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुख्याधिकारी जगदीश दळवी म्हणाले की, "नगरपंचायत अर्धापूर हद्दीतील मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकीदारांविरुद्ध विशेष वसुली मोहीम राबविण्यात येत आहे. थकबाकीदारांनी कारवाई टाळण्यासाठी तात्काळ थकीत कर भरणा करून प्रशासनाला सहकार्य करावे. अन्यथा नियमानुसार नळ कनेक्शन सील करणे, मालमत्ता जप्ती आदी कठोर कारवाई करण्यात येईल.

# हमीभावाने नोंदणी करावी : देशमुख

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

नाफेडच्या वतीने चना खरेदीसाठी ५८७५ ह.रू प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केल्याने शेतकऱ्यांनी चना ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे असल्याची माहिती नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर यांनी दिली आहे. शासनाच्या नाफेडने चना हमीभाव ५८७५ ह.रू क्विंटल दिला असल्याने शेतकऱ्यांनी नाफेडला तूर देण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी चना या पिकाची नोंदणी २०२६ डिजिटल सातबारा,आधार कार्ड,आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईल नंबर,नाफेड द्वारा खरेदी करण्यात येणाऱ्या शेतीमालाचे पेमेंट शेतकऱ्याच्या आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. पिकाची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने बायोमेट्रिक फिंगरप्रिंट मशीनद्वारे करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी स्वता हजर राहावे असे आवाहान कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# आमिष दाखवून फसवणूक करणारा अटकेत

**डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील आहवा पोलीस स्टेशन हद्दीत गुंतवणूकदारांना दुप्पट नफ्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या वॉन्टेड एजंटला पकडण्यात डांग लोकल क्राईम ब्रँच (LCB) ला मोठे यश मिळाले आहे. जिल्ह्यातील फरार आणि वॉन्टेड आरोपींना अटक करण्यासाठी देण्यात आलेल्या कडक सूचनांच्या पार्श्वभूमीवर डांग-आहवा पोलीस अधीक्षक पूजा यादव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जे.एच. सरवैया यांच्या मार्गदर्शनाखाली LCB पथक तपास करत होते. यावेळी PSI जे.जी. उंडकट आणि त्यांच्या पथकाला मानव स्रोत आणि तांत्रिक माध्यमातून गोपनीय माहिती मिळाली की फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपी संजयभाई धीरुभाई राठोड हा वलसाड जिल्ह्यातील बलवाडा गावात एका लग्नसमारंभासाठी येणार आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी बलवाडा येथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.या प्रकरणातील माहितीनुसार आरोपी संजयभाई राठोड (रा. हेमंतबाग, मोगरावाडी, वलसाड) याने एका मार्केटिंग कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी फिर्यादी आणि इतरांना आमिष दाखवले होते. त्याने गुंतवणूकदारांना आश्वासन दिले होते की गुंतवलेली मूळ रक्कम ६ महिन्यांत परत मिळेल आणि ७ महिन्यांत रक्कम दुप्पट होईल. या आमिषाला बळी पडून गुंतवणूकदारांनी एकूण १८,४०,००० रुपयांची गुंतवणूक केली होती. सुरुवातीला आरोपीने विश्वास संपादन करण्यासाठी टप्प्याटप्प्याने ३,००,००० रुपये परत दिले, मात्र उर्वरित १५,४०,००० रुपये परत न देता विश्वासघात आणि फसवणूक केली. या संदर्भात आहवा पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता कलम ३१८(४), ६१(२), ३(५) तसेच जीपीआयडी ॲक्ट-२००३ आणि प्राईज चिट्स अँड मनी सर्क्युलेशन (बॅनिंग) ॲक्ट-१९७८ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सध्या डांग लोकल क्राईम ब्रँचने अटक केलेल्या ४२ वर्षीय आरोपी संजय राठोड याला पुढील कायदेशीर कारवाई आणि तपासासाठी आहवा पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# बाभुळगाव येथील अनेक लाभार्थी यांना प्रमाणपत्रे वाटप

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

तुप्पा येथे छत्रपती शिवाजी महाराज महास्वराजय अभियानात बाभुळगाव येथील अनेक लाभार्थी यांना विविध योजनांचा अंतर्गत प्रमाणपत्रे वाटप नांदेड उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ,तहसीलदार संजय वारकड सरपंच पुंडलिक मस्के व मान्यवरांच्या उपस्थितीत बाभुळगाव येथील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज महास्वराजय अभियाना अंतर्गत तुप्पा मंडळ अंतर्गत येथे 7 मार्च रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,या अनुषंगाने सरपंच पुंडलिक मस्के पाटील यांनी विविध योजना अंतर्गत लाभार्थी असलेल्या ग्रामस्थांना यांच्या फायदा होण्यासाठी विविध योजना साठी लागणारे कागदपत्रे साठी पुढाकार घेऊन नोंदणी केली,यात संजय गांधी निराधार योजना,श्रावण बाळ योजना,यासह अनेक योजना मधील जवळपास विस महिला पुरूष नागरिकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. बाभुळगाव ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत सरपंच पुंडलिक मस्के यांनी या पुर्वी शासनाच्या विविध योजना गावातील लाभार्थ्यांना मिळवण्यासाठी पुढाकार घेऊन सेतु सुविधा मार्फत ऑनलाईन कागदपत्रे दाखल करुन पुढाकार घेतला असून जवळपास अनेक लाभार्थी यांना संजय गांधी निराधार, आयुष्मान कार्ड,व्दियांग, स्वस्त धान्य दुकान मार्फत अन्नधान्य पुरवठा,यासह डिजिटल सातबारा,पिक विमा सह अनेक योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे.

# 'शिवरायांचे आठवावे रूप' या व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## शिवजयंती व तुकाराम बीजोत्सव निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे विठ्ठल मंदिरात आयोजन

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**




छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाचे औचित्य साधून जामखेड येथील श्री विठ्ठल मंदिरात शुक्रवार दि.२७फेब्रुवारी २०२६ ते शुक्रवार दि.६मार्च २०२६ या कालावधीत 'सोहळा भक्ती आणि शक्तीचा ' अर्थात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सप्ताहाचे हे ३९ वे वर्ष होते. या सप्ताहात काकडा भजन,श्री. विठ्ठल रूक्मिणी महापूजा, जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या गाथेचे सामूहिक पारायण,गाथा भजन, प्रवचन ह भ प विजय महाराज बागडे सर व पंढरीनाथ राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या कार्यक्रमात निष्ठावंत ज्ञानी वारकरी महापुरुषांचे कीर्तन या दैनंदिन कार्यक्रमांसोबत यावर्षी 'शिवरायांचे आठवावे रूप' अर्थात जिजामातेने शिवबांना दिलेले संस्कार या विषयावर ४दिवसीय सांगितिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. संत साहित्याचे अभ्यासक व सध्या बांधखडक शाळेत कार्यरत असलेले आदर्श शिक्षक मनोहर इनामदार, सेवानिवृत्त प्रवर अधिक्षक डाकघर अहिल्यानगर सदानंद होशिंग आणि ल.ना.होशिंग माध्य.विद्यालयाचे माजी प्राचार्य श्रीकांत होशिंग यांनी आपल्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषेत शिवचरित्राचे गान केले.दि.२मार्च ते ५मार्च २०२६ या कालावधीत रोज दुपारी ४:००ते सायं.५:३० या वेळेत संपन्न झालेल्या या व्याख्यानमालेस जामखेडकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.ही व्याख्यानमाला म्हणजे जामखेडच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासातील एक प्रेरणादायी असा सांगितिक कार्यक्रम ठरला असून याचे सादरीकरण युवकांना प्रेरीत व प्रोत्साहित करण्यासाठी गावागावात व्हायला हवे असे गौरवोद्गार मधुकर आबा राळेभात यांनी व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी बोलताना काढले.या सांगितिक तथा सांस्कृतिक व्याख्यानमालेचे दिग्दर्शन गुलाब जांभळे यांनी केले होते.आज शुक्रवार दि.६मार्च २०२६ रोजी ह.भ.प.भरत म.पाटील जळगावकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. हा कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पाडण्यासाठी आबासाहेब वीर सर, अंकुश शेठ उगले, दिगंबर चव्हाण, पोपट नाना राळेभात, कॅप्टन लक्ष्मण भोरे साहेब, डॉ.कल्याणराव काशीद,मोहन पवार, संजय काशीद, पवन राळेभात यांनी कष्ट घेतले व या कार्यक्रमासाठी काही मान्यवर अन्नदाते व वर्गणीदार यांनी मनापासून सहकार्य केले.